# माणूस

शनिवार । २९ सप्टेंबर १९७९ । ७५ पैसे


## विदर्भ महापूर

**गावं आणि माणसं दोन्ही खचलेली आहेत.**

**मग्रूर नोकरशाही अशाही परिस्थितीत लाजत नाही.**

**गरज आहे सूत्रबद्ध नियोजनाची.**

विदर्भात महापुराने नद्याकाठच्या गावांना बसलेल्या तडाख्याने हाहाःकार उडाला. वृत्तपत्रांतून पुरामुळे झालेल्या जीवितवित्त हानीची वर्णने वाचून सर्वांचीच अंतःकरणे हेलावून गेली. पूरग्रस्तांना साह्य करण्यासाठी शासन-यंत्रणा कामाला लागली. काही सेवाभावी संस्थांनी मदतकार्यात पुढाकार घेतला. राजकारणी मंडळी सहानुभूती दाखविण्यासाठी पुढे सरसावली; पण ते ज्या वेळी गेले, त्या वेळी कॅमेरे सज्ज ठेवूनच गेले. बुटीबोरीवर प्रामुख्याने मदतकार्याचा जोर होता. रोडवरच्या बरबडी, कांढळी या गावांनाही ह्या मदतकार्याचा काही वाटा मिळाला. बाकी असलेल्या भागात कुणी फारसे फिरकले नाही. बुटीबोरीला तर खाद्यपदार्थांची इतकी रीघ लागली की नासल्यामुळे काही वेळा खाद्यपदार्थ वाया गेल्याच्या कहाण्या ऐकायला मिळाल्या. छात्र-युवा-संघर्ष वाहिनीच्या नागपूर शाखेने पूरग्रस्तांना कशाप्रकारे मदत करता येईल याचा विचार केला. त्या वेळी अशी स्थिती होती की, सरकारी आणि सेवाभावी संस्थांची मदत जोरात सुरू असताना त्याच प्रकारची मदत घेऊन पुढे सरसावण्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने आपल्याला काही करता येईल काय, याचा विचार वाहिनीच्या कार्यकर्त्यांनी केला. पूरग्रस्त विभागात साधारणतः तीन आठवडे—महिनाभर अन्नधान्य, कपडे वगैरे मदत सुरुवातीस पोहचल्यानंतर पुढे हळहळू अशी मदत थंडावत असते आणि पुरामुळे झालेल्या समस्यांशी झगडत गावे तशीच कण्हत राहतात आणि मदतीसाठी सरकारी यंत्रणेच्या कृपेवर आशाळभूतपणे अवलंबून राहणे यापेक्षा पूरपीडितांच्या जवळ काहीच उरत नाही, हा आजवरचा अनुभव आहे. हे सारे लक्षात घेऊन दीर्घ मुदतीच्या सेवा—योजना आपल्याला हाती घेता येणे शक्य आहे का, याचा शोध घेऊन नंतर आपल्या कुवती-प्रमाणे काही ठराविक क्षेत्रात काही क्रमबद्ध कार्यक्रम अंमलात आणायचा असे ठरले. त्यासाठी प्रथम सर्वेक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला.

सर्वेक्षणातून पूरपीडितांच्या वास्तविक गरजांचा तपास घेणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. त्यात पुराने झालेल्या हानीचे स्वरूप, पूर-

पीडित कुटुंबांची आर्थिक स्थिती, घरातील माणसे, कमावती माणसे, रोजगाराची साधने व त्यांचे झालेले नुकसान, नव्या रोजगारासंबंधी लोकांची मानसिक तयारी काय आहे, उभारणीच्या कामाला सामूहिकपणे सहकार्य करण्याची प्रवृत्ती, सरकारी मदत कशी, केव्हा, किती आणि कोणाला मिळाली, गरजूंना मदत मिळाली की नाही, त्यांच्या निवाऱ्याची पर्यायी व्यवस्था तात्पुरती का होईना होत आहे की नाही, पुनर्वसनाबाबत त्यांच्या अपेक्षा, अडचणी इ. बाबींचा विचार करण्यात आला. वाहिनीच्या २१ कार्यकर्त्यांच्या ४ तुकड्यांनी एकूण १४ गावांची पाहणी केली. पूरपीडितांच्या तोंडून त्यांच्या करुण कहाण्या ऐकताना आलेला अनुभव या प्रतिवृत्तामध्ये मांडता येणे शक्य नाही. मात्र पाहणी करताना हाती आलेले काही निष्कर्ष समोर मांडण्याचा इथे प्रयत्न केलेला आहे.

## गावांची रयाच गेली !

पुरामुळे गावांची भयंकर दुर्दशा उडालेली आहे. एकेका गावाचे चित्र नजरेसमोर आले की जिवाचा थरकाप उडतो. गावांची रयाच निघून गेली आहे. आपद्ग्रस्तांच्या मनात भीतीचा एवढा जबरदस्त धक्का अजूनही आहे, की पुराच्या आठवणी सांगताना त्यांची दृष्टी सैरभैर होते. सुरूवातीच्या दिवसातली गोष्ट. आमचे कार्यकर्ते कन्हारगावला पोहोचले. त्या वेळी तिथे कुठलीही मदत पोचलेली नव्हती. इतर गावांना हेलिकॉप्टरमधून मदत मिळत होती; पण हेच गाव नेमके त्यातून सुटले होते. गावाचा संबंध सर्व बाजूंनी तुटलेला. विचित्र परिस्थिती होती. घरे वाहून गेलेली. मंडळी ३ दिवसांपासून असहाय्य स्थितीत साहाय्याविना पडून होती. गावात कुणीही मदतीचा हात पुढे करीत नव्हते. कार्यकर्ते सायंकाळी गावात पोहोचले. त्यावेळी तहसीलदार पूरपीडितांना प्रतिमाणशी ४ रु. मदत त्यांचे महसूलखात्याचे सहकारी आणि ग्रा. पं.चे सदस्य ह्यांच्या साह्याने वाटत होते. कार्यकर्त्यांनी ग्रामस्थांची भेट घेऊन आपत्ती कोसळली असतानाही कोणी मदतीचा हात पुढे करीत नाही, याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. गावातून आपण अन्नधान्य गोळा करू, आम्ही तुमच्या सोबत येतो, असे त्यांना म्हणता सहकार्यासाठी भराभरा लोक पुढे आले. सधन आणि सुखवस्तू शेतकऱ्यांनी भराभर मदतीचे आकडे सांगायला सुरुवात केली. २, ३, ५ कुडव ज्वारी ज्याने त्याने ऐपतीप्रमाणे दिली. रिकामी पोती घेऊन गावातून गावकऱ्यांसोबत फिरून धान्य गोळा करण्यात आले. १–१।। पोते धान्य थोड्या वेळातच गोळा झाले. आणखीही धान्य मिळू शकले असते; पण एवढ्यात हेलीकॉप्टर घिरट्या घालताना बघून सगळी माणसे तिकडे धावली आणि धान्य गोळा करायचे काम तिथेच थांबले. मात्र एक निष्कर्ष ह्यातून हाती आला. संघटनशक्ती क्षीण झालेली दिसली आणि नेतृत्वाचा अभाव जाणवला. कोणी तरी आवाज देण्यासाठीच जणू सारेजण थांबले होते.

## आष्ट्याचा अनुभव

आष्ट्याचा अनुभव विलक्षण आहे. इथे पुराच्या तडाख्यात सापडलेल्या बौद्धवाड्याची कहाणी मोठी हृदयद्रावक आहे. आष्टा गावापासून बौद्धवाडा मधल्या खोल घळीमुळे वेगळ्या पडलेल्या टेकाडावर आहे. पूर चढला त्या दिवशी गावातील शाळेचे शिक्षक सकाळी सात वाजता बौद्धवाड्यात गेले होते. त्यांना पुराचे पाणी चढताना दिसले. त्यांनी लोकांना पुराच्या धोक्याची कल्पना दिली. एकाएकी पुराचे पाणी इतके चढले की पाण्याने बौद्धवाड्याला पूर्णपणे वेढले. बचावाचा मार्गच शिल्लक राहिला नाही. पाणी घराघरातनं घुसू लागले. घरे पाण्यात आली. तिथे चिंचेची दोन मोठाली झाडे आहेत. श्री. सावळे गुरुजींनी चिंचेच्या झाडांवर खाटा बांधण्याची कल्पना सांगितल्याबरोबर सारेच कामाला लागले. सावळे गुरुजी मदत करीत होते. जमतील तेवढ्या खाटा चिंचेच्या झाडावर बांधून त्यावर म्हातारे, मुले आणि स्त्रियांना हलविले. झाडाखालचा भाग जलमय झालेला. पूर ओसरेपर्यंत लोक झाडावर जीव मुठीत धरून बसले होते. त्या वेळी त्यांची मनःस्थिती कशी असेल याची कल्पना करवत नाही. समाजात तुरळक का होईना सावळे गुरुजी आढळतात, म्हणून माणुसकी अजूनही जागी आहे असे वाटते.

एक गोष्ट सर्वच गावांत प्रामुख्याने आढळली. ज्यांची घरे वाहून गेली, चीजवस्तू, धान्य, कपडेलत्ते नाहीसे झाले, अशांसाठी जास्तीत जास्त मदत मिळणे आवश्यक होते; पण ज्यांचे काहीच नुकसान झाले नाही, जे सुरक्षित आहेत अशांनीही मदत घेण्यासाठी मागे पाहिले नाही. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी याद्या तयार करताना ह्या सुरक्षित लोकांची नावे स्वार्थीपणाने आणि गावातल्या गलिच्छ राजकारणाच्या आश्रयाने घुसडण्यात आली. म्हणजे आता ज्या याद्या तयार झाल्या त्या आधारावर शासकीय मदत ह्या गैरगरजू लोकां-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : अठरावा
२९ सप्टेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

कडे बिनदिक्कत पोचत राहणार ! शासनाने ह्या याद्या सखोल तपासणी करून दुरुस्त करून घ्याव्या. शासनाने पूरग्रस्तांना मदत करण्याचा हेतू प्रामाणिक आहे यात शंका नाही; परंतु नोकरशाही यंत्रणेत करुणेचा अभाव आणि अत्यंत हीन मनोवृत्तीमुळे गावोगाव निर्माण झालेली राजकारणाची गटारं, यामुळे गरजूंची मदत मतलबी लोकांकडून पळविली जाण्याची दाट शक्यता आहे. पूरग्रस्ताशी कोणत्याही सहज गप्पा केल्या तर ते नावानिशी सगळे घोटाळे सांगू लागतात. त्यांच्या एकेकट्यांच्या म्हणण्याला गावातील बडी मंडळी आणि सहकारी कर्मचारी धुडकावून देतात. म्हणून पूरग्रस्त आणि त्यांच्याविषयी सहानुभूती असलेल्या इतर गावकरी मंडळींनी संघटितपणे शासनाच्या मदतकार्यावर देखरेख ठेवण्यासाठी लोकसमित्या स्थापन कराव्या. ह्या समितीत असणाऱ्या लोकांनी मात्र कुठल्याही पक्षाच्या राजकारणापासून दूर असण्याची गरज आहे. नाही तर देखरेखीतही पुन्हा घाण शिरल्याशिवाय राहणार नाही. येथे आणखी एक सूचना करावी वाटते की, पूरग्रस्तांच्या घरादारांची घडी नीट बसवून देण्याचे कार्य दीर्घ काळ चालणारे आहे. त्यासाठी प्रचंड प्रमाणावर पैसा खर्च होईल आणि तितक्याच उदंड प्रमाणावर अपहार होण्याची शक्यता आहे. त्याकरिता सरकारने स्वतःची अशी 'देखरेख शाखा' (व्हिजिलन्स ब्रँच) कायम करण्याची आवश्यकता आहे. ही शाखा जर उपयोगी सिद्ध झाली, तर तिचा अन्य क्षेत्रातही वापर करून घ्यायला पुष्कळच वाव आहे.

## राजकारण्यांचा डोळा

काम करीत असताना एका गावात आम्हाला लोकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. लोक आपापली दुःखे आणि आम्हाला अपेक्षित माहिती सांगत होते. गावातील राजकारणी लोकांचा त्यामुळे काय समज झाला कुणास ठाऊक. त्यांनी गावात 'हे आर. एस्. एस्.चे लोक आहेत. जनसंघवाले आहेत. यांच्या नादी काय लागता ? अशा प्रकारची अफवा पसरविणे सुरू केले. जमेल तेवढे दडपणही आणले. त्यामुळे नंतर लोक बिचकून गेले. नंतर त्याच गावातले एक बुजुर्ग गृहस्थ वाहिनीच्या कार्यकर्त्यांशी बोलायला आले. त्यांचा काही तरी पूर्वग्रह झालेला दिसला. मदतीच्या वाटपासंबंधी मुद्दा निघाला. सुरक्षित लोकांनाही मदत मिळाली या आक्षेपावर त्यांचे म्हणणे असे की, त्यांनाही मदत मिळाली तर काय हरकत आहे ? मिळते तर मिळू द्या. एकूण 'अशा प्रकारांचे' त्यांनी समर्थन केले. नंतर ते कार्यकर्त्यांना म्हणाले की, 'तुम्ही आंदोलन करायला आले आहात काय ?' कार्यकर्त्यांनी त्यांना सांगितले की, 'आमची भूमिका राजकीय नाही. आम्हाला नेतृत्व वगैरेही काही करायचे नाही. जे काही करायचे ते इथले गावकरीच करतील. पूरग्रस्तांनी पुन्हा नव्याने जीवनाच्या तयारीला एकजुटीने लागावे हीच आमची इच्छा आहे.', पण त्या वेळी तरी त्यांचे समाधान झालेले दिसले नाही. त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; पण यश आले नाही. ते असे का वागले याचे कोडे कार्यकर्त्यांना पडले. पुढील दिवसांत वाहिनीच्या कामाचे स्वरूप कळल्यावर त्यांचा गैरसमज निवळेल, एवढेच नव्हे तर ते सहकार्याचा हात पुढे करतील अशी अपेक्षा करायला काही हरकत नाही.

## सरकारी सेवेचा मयूर नमुना

सरकारी यंत्रणेतील गलथानपणाची तर कित्येक उदाहरणे मिळू शकतील. जैतापूर गावाला उपाशी पूरग्रस्तांसाठी पाठविलेल्या २ पोती ब्रेड्स 'ज. पूर' की जयतापूर ' ह्या घोटाळ्यामुळे आष्ट्यातच पडून राहिल्या, कुजल्या आणि वेणा नदीत फेकून देण्यात आल्या; पण नदीच्या पैलतीरावर असलेल्या आपद्ग्रस्ताच्या तोंडी लागल्या नाहीत !

पूर येऊन तीन आठवडे उलटले. नुकसानीची पहाणी करण्यासाठी भेट द्यावी म्हणून अनेकदा खेटे घातल्यानंतर नायब तहसीलदार महागावला जाताना दिसले. त्या वेळचे दृश्य वैशिष्ट्यपूर्ण होते. बरबडी ते महालगाव ह्या १ मैल अंतरासाठी नायबसाहेब घोड्यावर बसून जात आहेत आणि १५-२० गावकरीमंडळी त्यांच्या मागून पायीपायी चालत आहेत. म्हणजे नोकरशाहीचा रुबाब अशा आपत्तीच्या कामीही लाजत नाही. सरकारी मयूर सेवेचा हा नमुनाच आहे.

नसलेले नियम सांगून गोंधळ निर्माण करण्याच्या चातुर्याचा आणखी एक मासला. दहेली गावासाठी मदत म्हणून आलेला रसदसाठा (३१ पोती तांदूळ, ३० पोती आटा, अडीच पोती चून व ७ पिंप तेल) बेल्यातच १६-१७ दिवसांपासून पडून होता. दहेलीला अगोदरच मदत मिळाल्यामुळे हा धान्यसाठा त्यांना विकत घ्यावा लागेल. तहसीलदाराचे म्हणणे असे की, दहेलीत दुकान नसल्यामुळे हा साठा पडून आहे. कोणा दुकानदाराने सरकारकडून हा माल विकत घेऊन मग चिल्लर विकावा. गावकरी आणि दुकानदार आटा सोडून सर्व माल विकत घ्यावयास तयार. कारण इतके दिवस पडून असलेला आटा खराब झालेला असणार. त्यावर तहसीलदाराचे म्हणणे असे की, सर्वच साठा एकदम विकत घ्यावा लागेल. आटा किंवा इतर कोणतीही वस्तू नाकारल्यास कोणताच माल मिळणार नाही व सर्व साठा सरकारी गोदामास परत जाईल. घ्यायचे असेल तर सर्व घ्या, नाही तर काहीच नाही. ऑल आर नन् असा सरकारी नियम असल्याचे ते म्हणाले. नियमच असेल तर काय बोलणार ? कार्यकर्ते चूप झाले. पुढे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे चौकशी करता असा सरकारी नियम नसल्याचे त्यांनी सांगितले. एकूण, असे वागल्याने त्यांच्या कोणत्या भावनांचे उपशमन होते, हे कळत नाही; पण कळायला हवे, आणि त्यावर उपायही व्हावा.

## बरबडीचे काय ?

बरबडी गावाची पाहताक्षणी गहिवरून यावे अशी स्थिती आहे. टेकाडावरची थोडीशी घरे सोडली तर एकूणएक घर कोसळून सगळा गाव एक मातीचा ढिगारा बनला आहे. प्रत्यक्ष पुराच्या वेळी काय स्थिती असेल ? लोकांच्या मनात भीती आहे. पुढं कसं होईल ? असी अनिश्चितता असल्याने, लोक धैर्य एकवटू शकत नाहीत. गाव आणि माणसं दोन्ही खचलेली. चर्चेच्या ओघात असे कळले की बरबडी गाव टाटांनी दत्तक घेतले आहे व तशी घोषणा आकाशवाणीवर झाली होती. तशी चौकशी येथील सरपंचाकडे केली असता ते म्हणाले की, अधिकृत अशी काही माहिती त्यांच्याकडे नाही. कलेक्टरने त्यांना एकदा सांगितले होते की, टाटांची माणसे सर्वेक्षणासाठी येतील; पण

अजूनपर्यंत कोणी आलेले नाही ! पुरास तीन आठवडे लोटल्यावरही टेंपररी शेडस् बांधण्यात आलेले नव्हते. काही सांगाडे उभे दिसले. आमचे गाव आदर्श गाव झाले पाहिजे असे काही लोक म्हणाले. याला आधार काय ? तर टाटांनी गाव दत्तक घेतले या आकाशवाणीप्रसारित आवईचा. असे एकूण सगळेच धूसर चित्र आहे.

## काही प्रश्न

पूरग्रस्तांच्या प्रश्नांपैकी उल्लेखनीय प्रश्न.

१. शासकीय मदतीच्या अपहारासंबंधी मदत वाटपाबाबतचे धोरण एकसारखे नाही. काही ठिकाणी एकाच गावात काहींना प्रतिकुटुंब मदत तर काहींना प्रतिव्यक्ति मदत देण्यात आली. ह्या पंक्तिप्रपंचामुळे असंतोष निर्माण झाला आहे.

२. टेंपररी शेड उभारण्याचे काम मंद गतीने सुरू आहे असे आढळले. अनेक गावांत कित्येक कुटुंबे कोणाच्या ओसरीवर तर कुणाच्या गोठ्यात, शाळेत किंवा ग्रामपंचायत कार्यालयात आश्रय घेऊन राहिलेली दिसली. त्यांची कुचंबणा आणि दैन्य पाहवत नाही ! पुन्हा पाऊस आला तर त्यांचे अतोनात हाल होतील. त्यांना शेड्समध्ये हालविणे आवश्यक आहे.

३. गावातील घरांचे ढिगारे उपसण्याचे काम रोजगार हमी योजनेत घ्यावे: मजुरी नियमितपणे मिळावी. जवळ पैसा नसल्यामुळे आणि संसाराला लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीची नव्याने गरज असल्याने मंजुरी मिळण्यातला विलंब किंवा अनियमितता सामान्यांना अत्यंत कष्टदायक होते.

४. टेंपररी शेडसच्या नजिक पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र सोय करणे आवश्यक आहे. जिथे दुसऱ्या कुणाच्या विहिरीवर पाणी भरावे लागते, त्याने पाणी भरणे बंद केल्यास लोकांना भयंकर त्रास सोसावा लागतो.

५. वसाहतींच्या ठिकाणी वीज उपलब्ध नसेल तिथे दिवाबत्तीची सामान्य सोय होणे आवश्यक आहे.

६. पूरग्रस्तांना जास्त भाव आकारून लुबाडल्याची कित्येक उदाहरणे आढळतात. सरकारी स्वस्त धान्याच्या दुकानातून नियंत्रित दरात धान्य, किराणा, कापड आणि अत्यावश्यक गरजेच्या वस्तू उपलब्ध व्हायला हव्यात. त्यामुळे लोकांचे अशा आपत्काली भयंकर शोषण होत आहे, ते थांबवता येईल.

७. पूरग्रस्तांना रोजगार पुरवितांना शेतमालावर आधारित अशा उद्योगधंद्यांची साधने पुरवायला हवीत. शिवाय मजुरी करणाऱ्या प्रत्येक पूरपीडित कुटुंबाला गाय देणे जमत नसेल तर बकरी तरी देण्यात यावी. सहायक उत्पन्न म्हणून त्याची मदत होईल.

## पुनर्वसनातील खोळ

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न पुनर्वसनाचा आहे. नवीन आबादीची जागा निवडण्याच्या प्रश्नावरून, गावातल्या पूरपीडितांच्या अपार दुःखावरून सर्वांचे लक्ष उडाले असून, गावाच्या हितापेक्षा खाजगी स्वार्थाने वरवटलेले ग्रामीण राजकारण आपल्या संपूर्ण रोगट लक्षणांनी, पुन्हा उजळून आलेले आहे. श्रीमंतांना आपल्या गावातील मजूर गाव सोडून गेल्यास आपल्या शेतीचे कसे, हा प्रश्न छळतो आहे. तर मजूर, हातावरच पोट भरायचं आहे, कुठंही काम करून पोट भरू, पण आता ह्या गावात पुराच्या संकटाखाली राहायचं नाही, अशा पोटतिडिकेच्या मताचा आहे. काही गावांतील सामान्य मंडळी मनातून पूर्णपणे पुनर्वसनास अनुकूल झालेली आहेत, पण बड्या आसामीसमोर त्यांची बोबडी वळते. शेतकरी आपल्या जमिनी वाचवून दुसऱ्यांच्या शेतांत पुनर्वसन घुसवण्याचा प्रयत्न करतो आहे. विरोधकांचा चुराडा होत असेल तर उत्तमच. ह्या सगळ्या तणावातून मार्ग शोधताना आबादी निश्चित करतेवेळी प्रत्यक्ष पूरग्रस्त आणि बहुमताचा फरक काय आहे, हे पाहणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष पुराच्या तडाख्यात सापडलेल्यांना भीतीने ग्रासले आहे. त्यांची पुनर्वसनाची मागणी असेल त्यांच्यापुरते का होईना, त्यांना दुसरीकडे कुठेतरी सुरक्षित जागी वसविण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारावी. गावातील जमीनदारांना मजुरांची गरज आहे म्हणून मजुरांनी (जीव धोक्यात घालून) गावातच रहावे असा युक्तिवाद करणे अमानुषपणाचे आहे. (असा युक्तिवाद करणारी काही मंडळी आम्हाला भेटली.) पुनर्वसन ग्रामव्यवस्थेच्या सगळ्या गरजा लक्षात घेऊन झाले पाहिजे. पुष्कळ ग्रामस्थांच्या ह्या बाबतीतल्या कल्पना फारच अस्पष्ट आढळल्या. जुन्या गावठाणात असलेली गावे वाढत्या लोकसंख्येमुळे फारच दाटीवाटीची आणि गुदरण्याच्या अवस्थेला येऊन ठेपली आहेत. नव्या गावाची रचना आरोग्यपूर्ण वातावरणात आणि सुनियोजित व्हावी.

## शंकेचे निरसन होणे आवश्यक

पुनर्वसनाचे एकूण चित्र स्पष्ट नाही. आश्वासनं लोकांना कितपत तगवतील हा प्रश्नच आहे. कारण पुढे तीन महिने राजकारणामुळे कुणालाच सवड राहणार नाही. उध्वस्त गावं पुराच्या जिव्हारी लागलेल्या आणि जन्मभर पुरणाऱ्या आठवणी उराशी घेऊन तशीच पडून राहतील.

पाहणीतील शेवटचा मुद्दा असा की, पाहणी केलेल्या सर्वच गावांतील लोकांना ठामपणे असे वाटते की, धरणाच्या पाण्याने एवढा पूर आला आणि हे संकट कोसळले. बरंवाईटं काय निघायचं ते निघो, पण धरणाबाबतच्या शंकेचे निरसन होण्यासाठी ह्या प्रकरणी गैरसरकारी तज्ज्ञांकडून चौकशी झाली पाहिजे. काही लोकांनी विचारले की, तंत्रज्ञांची चूक नसेल तर धरणांच्या डिझाईनमध्ये तर काही दोष राहिले नसतील ? त्यामुळे शेतीच्या नुकसानीचे संकट आमचेवर सतत टांगते राहील. आम्ही कुठेही गेलो तरी आमच्या जमिनी थोडेच सोबत घेऊन जाणार आहो. शिवाय आता वडगावला देखील धरण होते आहे. त्याबाबतीत पुराचा धोका लक्षात घेणे जरुरीचे आहे. धरणाविषयीच्या शंकांमध्ये तथ्य आहे असे वाटते. शास्त्रीय स्पष्टीकरण काही असले तरी शंका ही शंका म्हणून महत्त्वाची आणि भीतीदायक आहे. तेव्हा चौकशी झाली पाहिजे.

छात्र युवा संघर्ष वाहिनी पूरग्रस्त विभागात सुरुवातीस प्राथमिक स्वरूपाचे काम करून नंतर ३–४ गावांचे सघन क्षेत्र ठरविणार आहे. वाहिनीचे स्वरूप विराजकीय (नॉनपॉलिटिकल) आहे. काम करण्याच्या काही संकल्पना आहेत. पूरग्रस्त विभागात करावयाच्या कामाचे स्वरूप साधारणतः पुढीलप्रमाणे राहील.

(१) पूरग्रस्तांना साहाय्य करताना दयेपेक्षा सहयोगाची भावना.

(२) लोकांचा प्रतिसाद मिळेल तिथे काम करायचे. योजना अगोदर ठरवून गावात न जाता कुठलीही योजना लोकांच्या कल्पना-शक्तीचा वापर करून ठरविण्यात येईल. योजनेशी सहकार्य करण्याची लोकांची इच्छा ह्या गोष्टी अंतर्भूत राहतीलच.

(३) लोकांनी त्यांच्या गरजेच्या वस्तू लोकांकडून मिळवून किंवा विकत घेऊन देण्यापेक्षा त्यांच्या हाती लहानमोठे, परंपरागत किंवा नवे अवजार देण्यावर भर देण्यात येईल. सुरवातीस कोळ्यांना नायलॉनची जाळी (नायलॉन सूत देऊन त्यांच्याकडून विणून घेणे आणि जादा विणायची मजुरी देणे), काही गावात मजुरांना कोयते, बुरडांना बांबूहत्यारे, सुतारांना साहित्य इ. द्यायची योजना आहे. अवजारांमुळे गेलेला उत्साह परत आणायला मदत होईल.

(४) वाहिनी नेतृत्व करणार नाही. गावातून नव्या नेतृत्वाचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरू करण्याची शक्ती वाढीस लावता येईल.

(५) बेघरांसाठी ७५ ते १०० घरे बांधणे आणि १००० घरांना उद्योग पुरविणे असे सुरवातीचे उद्दिष्ट आहे. या कामी ऑक्सफाम आणि ग्रामोद्योग महामंडळाचे सहकार्य मिळणार आहे. पण घरे बांधताना सर्वांनी सर्वांसाठी काम करायचे हे सूत्र राहील. घरासाठी साहित्य पुरविण्यात येईल. पण घरे त्या गावाच्या लोकांनाच सामूहिक कार्याने बांधावी लागतील. पण हे काम आबादीसंबंधी सरकारी निर्णय होईपर्यंत मात्र हातीं घेणे शक्य होणार नाही.

(६) पूरग्रस्तांना सरकारी मदत पोचविण्याचा योजनांशी सहकार्य देण्याची वाहिनीची तयारी आहे.

(७) नवीन वसाहतीत विहिरी खोदण्याची गरज असल्यास वाहिनी श्रमदानाने विहिरी खोदून देईल. सरकारने त्या बांधून द्याव्यात.

(८) विविध शासकीय योजनांचे लाभ पूरग्रस्तांना मिळवून देण्यासाठी वाहिनी प्रयत्नशील राहील.

पूरग्रस्तांवर आभाळ फाटले आहे, ते शिवायचे कसे ? माणुसकी-बद्दल बोलणाऱ्या प्रत्येकाने त्यासाठी पुढे सरसावण्याची आवश्यकता आहे. छात्रयुवा संघर्ष वाहिनीला सर्वांच्या सहकार्याची आस आहे.

**—अनंत अमदाबादकर ● सतीश गोगुलवार**

---

## पुणे वार्ता

### रमेश मंत्री यांचा सत्कार सोहळा

# विनोदी लेखक जीवनविषयक दृष्टी देत असतो

### —प्रा. वा. ल. कुलकर्णी

पावसाळा जवळजवळ संपत आला आहे. दसरा अगदी नजिक येऊन ठेपला आहे. दसरा म्हणजे सीमोल्लंघनाचा दिवस ! याच दिवशी म्हणे पांडवांनी शमीच्या ढोलीत ठेवलेली शस्त्रे बाहेर काढली. आता काळ बदलला आहे. सीमोल्लंघन बदललं आहे, शस्त्रं बदलली आहेत, पांडवही बदलले आहेत !

पूर्वीच्या काळी योद्धयांना जे दसऱ्याचं महत्त्व वाटत असेल तेच महत्त्व आता साहित्यिकांनाही या दिवसाचं वाटायला लागलं असेल तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. कारण हा दसराच दिवाळीच्या मांजरपावलांची जाणीव प्रथम करून देतो. स्वयंपाक-घरात आणि साहित्यकांच्या 'लेखन—खोली 'तही तळणीला सुरुवात होते. ऑर्डरप्रमाणे माल बनवून दिला जातो—चकली, करंजी, शंकरपाळी, कडबोळी, कथा, लघुकथा, कविता, कादंबरी, कादं-बरिका, विनोदी साहित्य, साहित्याची भाषांतरं !

हे सर्व करत असतानाच साहित्यिकाची साहित्य संमेलनाचाही उग्र वास यायला लागतो. साहित्याची मोजणी व्हायला सुरुवात होते, मूल्यमापन सुरू होते आणि संपूर्ण वातावरणात एक निराळाच रंग भरायला लागतो.

२३ सप्टेंबरला मराठीतील विनोदी लेखक रमेश मंत्री यांचा त्यांची एका वर्षात चौतीस पुस्तकं प्रसिद्ध झाल्याबद्दल पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात मोठा सत्कार करण्यात आला. हा सोहळा पहात असताना वारंवार या उल्लेखिलेल्या गोष्टींची मला का कुणास ठाऊक पण अतिशय तीव्रतेने आठवण होत होती.

स्मारक मंदिराच्या बाहेर भव्य कमान उभारली होती आणि काही भगवे ध्वजही लावले होते. आपण चुकीच्या ठिकाणी तर आलो नाही ना, असं क्षणभर वाटलं; पण चौकीदाराला विचार-ल्यावर कळलं की रमेश मंत्र्यांचा सत्कार वरच्या मजल्यावर, रंग-मंदिरात होता आणि खालच्या हॉलमध्ये एकात्म मानवतावादावर एक भाषण होतं.

मी रंगमंदिराकडे जायला लागलो. जिन्याच्या दोन्ही बाजूंना ठेवलेल्या कुंड्यांमुळे शोभेपेक्षा जिना चढायला अडचणच जास्त होत होती. बरं, कठड्याला धरून जिना चढावा तर गुलछडीच्या फुलांच्या माळांनी कठडे मढवलेले! जरा हात लागला तरी 'कुस्करू नका ही सुमने' ही ओळ आठवायची आणि त्यातील 'सुमने' वरील श्लेष आठवून काळजात धस्स व्हायचं !

रंगमंदिरात पोचलो. थोडा उशीरच झाला होता त्यामुळे प्रवेश मिळेल की नाही याची धास्ती वाटत होती. दार उघडलं तर रंग-मंदिर जेमतेम अर्धं भरलेलं. हायसं वाटलं. का कुणास ठाऊक पण फार गर्दी पाहिली की आपण त्या गर्दीतले खिसेकापूच आहोत असं वाटायला लागतं !

शंकर सारडा बोलत होते—' मराठीमध्ये जयवंत दळवी किंवा वि. आ. बुवा वगळता मंत्र्यांइतकं विपुल विनोदी लेखन कोणीही केलेलं नाही. पुलंपेक्षासुद्धा मंत्र्यांची विनोदसंपदा जास्त आहे.' सारडांना ओरडून विचारावंसं वाटलं, 'विनोदसंपदा तुम्ही कशी मोजता ? अंतर फारच असल्याने आवाज पोचेल की नाही या शंके-नेच घसा कोरडा पडला.

सारडानंतर श्री. ज. आले. जीवनाकडे निर्मळपणे पाहून लेखक म्हणून अनुभव मांडणारा, नव्या जगाचं आव्हान स्वीकारणारा मनुष्य म्हणून त्यांनी मंत्र्यांचं कौतुक केलं. 'मराठी साहित्यक्षेत्रात जेवढे यश मिळवणं शक्य आहे, तेवढं त्यांनी मिळवलं आहे' असं एक सर्टिफिकेटही जोडलं.

मराठीं समीक्षकांनी मराठीतील विनोदी साहित्याला अजून पुरेशी दाद दिलेली नाही अशी कुरकुर करतच बाळ गाडगीळ माइकसमोर आले. मंत्र्यांबद्दलच्या काही आठवणीही त्यांनी आठवून आठवून सांगितल्या. माणसांवर प्रेम करणारा माणूस, म्हणून मंत्र्यांचा गौरव

केला. त्यांच्यानंतर आलेल्या बाळ सामंतांनीही गाडगीळांचीच री ओढली. 'आम्हाला काहीही म्हणा, पण म्हणा' असा काही तरी त्यांचा हट्ट होता.

त्यानंतर आले 'लोकसत्ता'चे विद्याधर गोखले. तोंडात पान खेळवत गोखले बोलू लागले. समीक्षक दाद घेत नाहीत म्हणून विनोदी लेखकांनी खंत का करावी, विनोदी लेखक कसा चंट पाहिजे. अशी गाडगीळ–सामंताना कोपरखळी मारतच गोखले श्रोत्यांवर कबजा घेऊ लागले. विनोद जीवनात, राजकारणात, सर्वत्र भरलेला आहे, राजनारायण तर असा विनोदी मनुष्य आहे की त्यांच्यावरून सारे विनोदी लेखक ओवाळून टाकावेत! जीवनाच्या दगदगीतून काही काळ सुटका करून घेण्यासाठी विनोदाचा आश्रय घेतला जातो, असं सांगत सांगत गोखले पुढे जात होते. श्रोत्यांनाही खेचून नेत होते. त्यांच्या बोलण्यात भरपूर खुसखुशीतपणा होता, पाल्हाळिकपणा होता, पण म्हणूनच सहजताही होती. या सबंध कार्यक्रमात श्रोत्यांशी खऱ्या अर्थानं संवाद गोखल्यांनीच साधला.

गोखल्यांनी घालून दिलेल्या सुसखुशीतपणाच्या वळणावरच ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी आपली गाडी नेली. रमेश मंत्र्यांनी त्यांना स्वतःच्या नाटकावर बोलायला सांगितलं. तेव्हा 'ही केवळ सुरुवात आहे.' असं सूचक बोलून नाडकर्णींनी रजा घेतली.

त्यानंतर विविध व्यक्ती व संस्थांतर्फे रमेश मंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. मंत्री एखाद्या पुढाऱ्यासारखे मान पुढे करून उभे होते. एकेकजण येऊन हार घालून, हस्तांदोलन करून जात होता, कॅमेऱ्याचा क्लिकक्लिकाट होत होता. थोड्याच वेळात हारांचा लहानसा ढीग टेबलावर साठला. मला वारंवार एखाद्या राजकीय पुढाऱ्याच्या स्वागताची आठवण होत होती.

समारंभाचे अध्यक्ष प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या भाषणाच्या आधीच मंत्र्यांनी सत्काराला उत्तर देऊन टाकलं. बहुधा 'हारांचं ओझं' त्यांना फारच जाणवलं असावं. रोजच्या प्रत्यक्ष जीवनातच विनोदी लेखनाची बीजं आपल्याला सापडल्याचं मंत्र्यांनी सांगितलं. कांही चांगले किस्से सांगितले, सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि मुख्य म्हणजे अगदी थोडक्यात आपलं भाषण आटोपलं.

प्रा. वा. ल. कुलकर्णी बोलायला उभे राहिले. सत्तरीचा, किरकोळ अंगयष्टीचा उंच माणूस. शरीराला भरपूर हेलकावे देत बोलणं. प्रा. कुलकर्णी म्हणाले –

'आज जीवनात प्रसन्नता निर्माण करणं अतिशय कठीण होऊन बसलं आहे आणि विनोदी लेखक ही प्रसन्नता निर्माण करतात. त्यांचे हे ऋण कधीही फेडता न येण्यासारखे आहे. गेल्या तीस वर्षात या देशांत राज्यकर्त्यांनी जास्तीत जास्त दुःख निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विनोदी लेखकांची अशा वेळीच खरी कसोटी लागते.'

समीक्षकांबद्दल गाडगीळ–सामंतांनी केलेल्या तक्रारीचा उल्लेख करून प्रा. कुलकर्णी म्हणाले–

'विनोदाची समीक्षा त्याच्या निर्मितीइतकीच कठीण असते. तसंच समीक्षकांना लेखनाला प्रवृत्त करण्यासाठी तितकाच जबरदस्त संपादक लागतो. विनोदी लेखनाची मराठीत जबरदस्त परंपरा आहे ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास या संतांच्या वाङमयातही विनोदाच्या विविध छटा आढळतात. एकनाथांची भारुडं किंवा दासबोधातील काही समासही त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.'

'पण एक गोष्ट या ठिकाणी स्पष्ट केली पाहिजे की, विनोदी लेखकाइतका वृत्तीचा गंभीर दुसरा कोणीही बसतो. विशिष्ट मूल्यांवर त्याची श्रद्धा असते. म्हणूनच तो व्यंगावर बोट ठेवू शकतो. त्यातूनच विनोदी लेखक जीवनविषयक दृष्टी वाचकाला देत असतो.

असं म्हटलं जातं की, **Life is a tragedy to those who feel and comedy to those who think.** विनोदी लेखक हा thinker असतो. म्हणूनच तो जीवनाकडे विनोदी दृष्टीतून पाहू शकतो. काय असायला हवं हे ज्याला माहीत असतं तोच उत्तम उपहास करू शकतो.'

प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांचा अतिशय कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून प्रा. कुलकर्णी म्हणाले,

'आजची देशातील राजकीय परिस्थिती अशी आहे की, तिच्याकडे डोळसपणे पाहिलं तर जहाल विनोद निर्माण करता येईल. मराठी लेखकांनी तसा प्रयत्न केलेला नाही ही माझी खंत आहे. मराठी नाटकांमध्ये शोकांतिकांपेक्षा सुखांतिकांची संख्या जास्त आहे. हे मराठी साहित्याचं वैभव आहे; परंतु खऱ्या अर्थानं विनोदी म्हणता येईल, अशी कादंबरी मराठी साहित्यात अजूनही निर्माण झालेली नाहीं. हे आव्हान आजच्या विनोदी साहित्यिकांनी स्वीकारलं पाहिजे. मराठीतील विनोदी लेखन खऱ्या अर्थानं प्रौढ होण्याची मी वाट पहातोय. त्यासाठी विनोदाकडे गांभीर्यानं पाहिलं गेलं पाहिजे! धोका पत्करूनही विनोदी साहित्यिकांनी हे आव्हान पेललं पाहिजे.'

प्रा. कुलकर्णी फार वेळ बोलले नाहीत. त्यांच्या बोलण्यात फारसं वक्तृत्वही नव्हतं; पण मराठी साहित्याबद्दल वाटणारी कळकळ, तळमळ, त्यांच्या शब्दाशब्दांतून जाणवत होती, श्रोत्यांना प्रभावित करत होती.

रात्रीचे साडेआठ वाजले होते. कार्यक्रम संपला होता. लोक पांगू लागले होते; पण पावसाची रिपरिप वाढली होती. मी स्वतःशीच विचार करत होतो – एका वर्षात चौतीस पुस्तकं प्रसिद्ध होणं निश्चितच कौतुकास्पद आहे; पण नुसत्या संख्येला किती महत्त्व द्यायचं? एवढ्या ३४ पुस्तकांपैकी वक्त्यांनी उल्लेख केला तो 'सह्याद्रीची चोरी,' 'जनू बांडे', 'थंडीचे दिवस', 'महानगर' यांचाच! उरलेल्या तीस पुस्तकांचं काय? तींच तीच नावं सर्व वक्त्यांनी का घ्यावीत? इतर पुस्तकांची नावं त्यांना आठवली नसतील? का आठवूनही त्यांचा उल्लेख करावासा वाटला नसेल? का वेळेच्या मर्यादेमुळे त्यांनी हा संयम ठेवला असेल? चावटपणातून निर्माण होणारा उथळ विनोद आणि विनोदातून आपोआपच निर्माण होणारा मोहरून टाकणारा चावटपणा–खरी मौज कशात आहे? नुसते प्रश्नच निर्माण होत होते. मी तसाच बाहेर पडलो. पाऊस अजूनही मुसमुसतच होता. त्याचे चार थेंब अंगावर पडल्यावर खूपच बरं वाटलं!

□

# श्री भगवान उवाच

**श्री भगवान उवाच**

कृष्ण म्हणे अर्जुना
तुझा माझा स्नेह जुना
तरी तुझ्या या दुर्गुणा
न जाणी मी ।

सारं कसं शांत शांत
तू मात्र चिंताक्रांत
दु:खार्जवी द्रौपदीकांत
बुडलासी का ।

की कसले भय नवेच
असुर कोणी टाकी पेच
का जिवासी काही ठेच
गुडाकेशा ।

**श्री अर्जुन उवाच**

नाही चिंता, नाही भय
तू असता मज हवेच काय
परी प्रश्न काही जाळत जाय
मन माझे ।

भारतदेशी चुकुनी गेलो
हस्तिनापुरी सहज हिंडलो
इंद्रप्रस्थही पाहू लागलो
कवतिके मी ।

एवढ्यात गाडी आली
त्यातूनी स्त्री एक उतरली
भक्तगणांची गर्दी झाली
दर्शनाला ।

बाईजींनी हास्य टाकले
भक्तांनी जयघोषही केले
जवळ गेले, कुणी दूर ठाकले
सोहळ्यात त्या ।

त्यातही कोणी पुरुष धीट
हाती घेती तिचा हात नीट
सावरत सोगा कुणी चाले ऐटीत
तिये पुढे ।

जो तो आश्चर्याने पाही
बाई बंगल्यात जाई
आत शिरायची घाई
कित्येकांची ।

'ऐक्य' 'ऐक्य' ऐसे आवाज येती
मधूनच काही शब्द पोचती
बाहेर जनांचे भाव पालटती
क्षणोक्षणी ।

अंमळ वेळाने नेतेही येती
गटागटामध्ये जे ते मिसळती
परस्परांमध्ये चर्चा करिती
दीर्घकाल ।

म्हणती कोणी उद्या पुन्हा भेटू
ऐक्यासाठी पुन्हा सर्वजण झटू
परस्परांमध्ये पदेही वाटू
उदईक ।

पुन्हा भेटूनी तेच बोलती
'चालू आहेत त्याच वाटाघाटी'
घाटा कोणाला वाटा कुणासाठी
वाद चाले ।

म्हणती कोणी-आम्ही मध्यस्थ
नाही सत्तेचा लोभ आम्हा जास्त
ऐक्याविना परी चित्त नाही स्वस्थ
आम्हा जनांचे ।

आणि एक दिन अचानक नेते
सांगती निर्णय सर्वांच्या मते
नाही आता ऐक्य, बोलणेही खोटे
तद्विषयी ।

असाच थोडा काळ लोटला
सुरुवात पुन्हा झाली वादळा
झेंड्याखाली नव्या होती जन गोळा
नवराज्य स्थापण्या ।

परी यांच्या दोऱ्या बाईच्या हातात
संपवला खेळ पंधरा दिवसांत
नेतेही तिच्याच मागे धावत
एका पाठोपाठ ।

आता तर काय सारा गोंधळ
जवळच दिसे सत्तेचं मृगजळ
निमित्त काढून काढतो पळ
बाईकडे जो तो ।

ट्रकांमधूनी माणसं आणिती
जागोजाग भव्य मेळावे होती
बाईपुढे सारे लोटांगण घालती
आरती करूनिया ।

हे सारे देवा काय बा गूढ
जन हे लबाड की केवळ मूढ

कशाची नेमकी त्यांजला ओढ
सांग तूच ।

**श्री भगवान उवाच**

जाणतो किरीटा तुझा गोंधळ
स्वाभाविकचि ढळणे तोल
प्रश्नाचे तुझिया नेमके मोल
जाणतो मी ।

गोष्टी आता काही सांगतो ऐक
जीवनी मर्त्या मोह अनेक
बळी जाती त्यामुळेच देख
कितीएक ।

मदिरासेवन कोणा आणी धुंदी
कोणी मदिराक्षेच्या कटाक्षाचा बंदी
धन आणि सत्ता ऱ्हासाची नांदी
कोणाकोणाच्या ।

त्यातही पार्था वाईट खास
घेतला स्त्रीने कशाचाही ध्यास
आडवा येणाऱ्याचा करून नाश
ईप्सित साधी ।

स्त्रीमुळेच झाले किती उत्पात
तिच्यापायीच प्राणही जात
मारती इतरा, कोणी मार खात
स्त्रीपायी ।

हिच्यापायीच ऋषी जे थोर
क्षणात विरली तपश्चर्या घोर
विश्वामित्राचाही संपला जोर
स्त्रीपायी ।

सीतेविना ना रामायणा अर्थ
घडला नसता एवढा अनर्थ
द्रौपदीविना हे महाभारत
घडते ना ।

मॅक्बेथ, हॅम्लेट हेच सांगती
स्त्रीनेच केली सारी अवनती
प्राणास मुकती तिचे प्रिय पती
तियेमुळे ।

किंवा रोमराज्यी क्लिओपॅट्रा नारी
परस्परांचे जे दोस्त भारी
झाले पाही ते जन्माचे वैरी
हिच्यापायी ।

एवढे कशाला, बघ पेशवाई
आज्ञा बदलवी कारस्थानी बाई
स्वास्थ्य तर गेले, राज्यही नाही
कोणालाच ।

आणि आवडती कैकेयी राणी
वर मागून मृत्यूच आणी
पुत्रमुद्धा नाही पाजण्या पाणी
मृत्यूसमयी ।

जिच्यावर मी अतिअनुरक्त
दिला आणूनी स्वर्ग–प्राजक्त
'फुले शेजारी, मला वृक्ष फक्त'
नाराज ती ।

त्यातूनही जर मिळाली सत्ता
वारसा काही जुना सांगता
कुणा देई हात, कुणा देई लत्ता
स्त्री ऐसी ।

'ऐक्य म्हणजे माझे ऐकणे'
सांगितले ठासून सर्वांना तिने
यत्न सोडला जे झाले शहाणे
पूर्वानुभवे ।

परी जगात शहाणे थोडे
बाकी सारेजण भारवाही घोडे
घास टांगता थोडासा पुढे
धावती सारे ।

त्यांच्यामुळेच आज ही स्थिती
हात कुणाचेही कुणाच्याही हाती
नाही यांना पण फार काळ गती
पाहशील तूही ।

–सतीश कामत


**प्रसिद्ध झाले**



**सांगत्ये ऐका**

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

तिसरी आवृत्ती, किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# निवडणुका

## मुख्य आव्हानाचा विसर

वा. दा. रानडे

इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील हुकूमशाही प्रवृत्ती देशात पुन्हा बळावू द्यावयाच्या नाहीत आणि त्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत होईल असे काहीही करावयाचे नाही ही येत्या निवडणुकांत सर्व लोकशाहीवाद्यांची मुख्य भूमिका असली पाहिजे आणि मतदारांना त्यांनी त्या दृष्टीने जागरूक केले पाहिजे.

महाराष्ट्रातील गेल्या एक-दोन आठवड्यांतील घटनांचा या संदर्भात विचार करायला हवा. पुलोद चालू राहणार की नाही? समांतर काँग्रेसचे भवितव्य काय? जनसंघाबाबत भूमिका कोणती? या प्रश्नांबाबत निश्चित निर्णय घेण्याच्या दृष्टीने राजकीय पक्षनेत्यांनी हालचाली केल्या. इंदिरा काँग्रेसविरुद्ध प्रभावी लढत देण्यासाठी पुलोद आघाडी चालू राहायला हवी; पण ती चालू ठेवायची तर आपल्या गटाचे अखिल भारतीय धोरण वेगळे आणि महाराष्ट्रातील धोरण वेगळे अशी परिस्थिती काही गटांच्या बाबतीत निर्माण झालेली आहे आणि अखिल भारतीय धोरणाशी सुसंगत असे धोरण महाराष्ट्रात स्वीकारावयाचे तर पुलोद आहे त्या स्वरूपात चालू ठेवता येणार नाही. काँग्रेसने अखिल भारतीय पातळीवर जनता पक्षविरोधाची आणि जनता एसशी आघाडी करण्याची भूमिका घेतलेली आहे; पण महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व मानणाऱ्या शरद पवारांच्या समांतर काँग्रेसने पुलोदमध्ये जनता पक्षाशी आघाडी केलेली आहे. एवढेच नव्हे तर मंत्रिमंडळात जनता पक्षाच्या जनसंघ मंत्र्यांबरोबर ते काम करीत आहेत आणि त्याला चव्हाणांची हरकत नसली तरी काँग्रेस कार्यकारिणीची होती. समांतर काँग्रेसला काँग्रेसमध्ये प्रवेश करायचा असेल तर तिने जनता पक्षाशी केलेली आघाडी मोडली पाहिजे अशी कार्यकारिणीची स्वर्णसिंग अध्यक्ष असेपर्यंत अट होती; पण देवराज अरस अध्यक्ष झाल्यानंतर या अटीचा पुनरुच्चार त्यांनी किंवा कार्यकारिणीच्या कोणा सभासदाने केलेला नाही. समांतर काँग्रेस, काँग्रेसमध्ये बिनशर्त विलिनीकरणास तयार आहे असे पवारांनी नुकतेच एका मुलाखतीत सांगितले.

या मुलाखतीतून त्यांची भूमिका स्पष्ट होण्याऐवजी उलट गोंधळ व शंका निर्माण झाल्या आहेत. समांतर काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन झाल्यानंतर शरद पवारांना पुलोद सध्याच्या स्वरूपात कशी चालू ठेवता येईल? काँग्रेस पक्षाने अखिल भारतीय पातळीवर जनता पक्षविरोधाची भूमिका घेतल्यानंतर महाराष्ट्रात जनता पक्षाशी आघाडी करण्याची भूमिका कशी घेता येईल? महाराष्ट्राची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन तेथे या धोरणास आम्ही अपवाद करीत आहोत आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील हुकूमशाही शक्ती बळावू नयेत यासाठी जनता पक्षाशी आघाडी करणे आवश्यक आहे असे महाराष्ट्रातील शाखेस वाटेल तर तसे करण्याची परवानगी देण्यात येत आहे, असा स्पष्ट ठराव कार्यकारिणीला करावा लागेल. कार्यकारिणी तसा निर्णय घेईल असे वाटते. केंद्रात जनता पक्षविरोधाची भूमिका घेणाऱ्या आणि महाराष्ट्रात मात्र त्या पक्षावरोबर आघाडी करणाऱ्या इतर पक्षांना सुद्धा अशीच भूमिका घ्यावी लागेल. महाराष्ट्रातील विशिष्ट परिस्थितीमुळे तेथे वेगळे धोरण स्वीकारण्याची मोकळीक तेथील शाखांना आम्ही देत आहोत, असे निर्णय इतर पक्षांच्या कार्यकारिणींनी घेतले पाहिजेत. पुलोदमध्ये समांतर काँग्रेस व जनता पक्ष याशिवाय शे. का. पक्ष, महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस हे इतर गट होते. त्यांपैकी म. स. काँ.ने इंदिरा काँग्रेसमध्येच विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. शे. का. पक्षाची भूमिका काय राहणार आहे? आपल्या केंद्र सरकार संबंधीच्या धोरणाशी सुसंगत धोरण घ्यावयाचे असेल तर पुलोद आघाडीतून आणि सरकारमधून शे. का. मंत्र्यांनी बाहेर पडायला हवे; पण हातची सत्ता व मंत्रिपदे सोडण्यास पुलोदमधील कोणताही घटक तयार होईल असे वाटत नाही: तात्त्विक भूमिकेच्या सुसंगतीपेक्षा सत्ता त्यांना महत्त्वाची वाटते. जनता पक्षातून बाहेर पडून जनता (एस्)ला मिळालेल्या श्रीमती शांती नाईक यांनासुद्धा मंत्रिपद सोडावयाचे नव्हते. वास्तविक जनता पक्षाच्या प्रतिनिधी म्हणून त्यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला होता आणि पक्ष सोडल्यानंतर त्यांनी स्वेच्छेनेच मंत्रिपदाचा राजिनामा द्यावयास हवा होता. जनता पक्षानेच त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची मागणी केल्यानंतर शरद पवारांना त्यांचा राजिनामा मागणे भाग पडले. जनता (एस)ला पुलोदमध्ये घ्यावयाचे की नाही याचा निर्णय पुलोदच्या समन्वय समितीने घ्यावयाचा आहे. तिने पुलोदला घ्यावयाचे ठरविले तर मंत्रिमंडळात जनता (एस)ला प्रतिनिधित्व देण्याच्या प्रश्नाचा विचार करता येईल असे पवार यांनी सूचित केले. त्यांनी मांडलेली भूमिका पुलोद आघाडीच्या कार्यपद्धतीच्या दृष्टीने योग्य आहे.

शुद्ध तात्त्विक भूमिकेतून विचार करावयाचा तर पुलोद आम्ही केवळ सत्तेसाठी टिकविणार की, विशिष्ट तात्त्विक भूमिकेसाठी टिकविणार याचा एकदा निश्चित निर्णय घ्यावयास हवा व त्याचा विचार करताना पुलोद ज्या विशिष्ट परिस्थितीत स्थापन झाली ती परिस्थिती लक्षात घ्यावयास हवी. १९७८ च्या विधानसभा निवडणुकी कोणत्याच पक्षाला निर्णायक बहुमत न मिळाल्याने दोन काँग्रेस पक्षांनी आघाडी करून काही अपक्ष सभासदांच्या पाठिंब्याने मंत्रिमंडळ बनविले. इंदिरा काँग्रेसच्या प्रभावाने व तंत्राने चालणारे हे मंत्रिमंडळ होते व त्यातून इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील हुकूमशाही प्रवृत्तींच्या शक्तींचेच बळ महाराष्ट्रात वाढत जाणार हे स्पष्ट दिसू लागले. वसंतदादा गटाने इंदिरा काँग्रेसपुढे ही जी लोटांगणवादी भूमिका घेतली, तिच्या निषेधार्थ शरद पवार गट काँग्रेसमधून बाहेर पडला. हा गट, जनता पक्ष आणि जनता पक्षाचे मित्रगट यांनी पुलोद आघाडी बनवून महाराष्ट्रात मंत्रिमंडळ बनविले. ऐक्याच्या बुरख्याखाली लोटांगणवादी भूमिका सोडून दादांचा गट आता सरळच इंदिरा काँग्रेसमध्ये सामील झाला आहे. केवळ लोकसभा निवडणुका जिंकण्याचेच नव्हेत तर पुलोदचे

मंत्रिमंडळ पाडून महाराष्ट्रात पुन: सत्तेवर येण्याचेही त्यांचे बेत आहेत. पुलोद फुटली तर हे बेत सिद्धीस नेणे त्यांना कठीण जाणार नाही. म्हणून पुलोद टिकवायला हवी.

इंदिरा कॉंग्रेसविरुद्ध सर्व लोकशाहीवादी शक्तींची आघाडी ही आजच्या परिस्थितीची मुख्य गरज आहे. शरद पवार ही भूमिका नेहमी मांडीत आलेले आहेत; पण त्यांची समांतर कॉंग्रेस कॉंग्रेसमध्ये विलीन झाल्यावर या भूमिकेचा ते पुरस्कार करू शकतील का ? इंदिरा कॉंग्रेस आणि जनसंघ वगळून महाराष्ट्रात बाकी गटांची आघाडी स्थापण्याच्या दृष्टीने मोहन धारियांच्या पुढाकाराने वाटाघाटी झाल्या; पण या आघाडीतून जनसंघाला वगळण्यास शरद पवार यांनी विरोध केला व त्यामुळे या प्रयत्नास फारसे यश येण्याची शक्यता दिसत नाही.

समांतर कॉंग्रेसमध्ये विलीन होणार असेल तर जनता पक्ष पुलोदमध्ये राहणार नाही असे मत जनता विधिमंडळ पक्षाचे नेते उत्तमराव पाटील यांनी व्यक्त केले. हे विलिनीकरण होऊ न देता समांतर कॉंग्रेस वेगळीच ठेवावी यासाठी पवारांचे मन वळविण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत असे त्यांनी सांगितले; पण हे विलिनीकरण आता अटळ दिसते; तेव्हा या परिस्थितीत पुलोद आघाडी टिकवायची की नाही याचा निर्णय घटक पक्षांना घ्यावा लागेल. समांतर कॉंग्रेसचे श्री. गोविंदराव आदिक यांनी एका भाषणात सांगितले की, समांतर कॉंग्रेसमध्ये विलिन होणारच व मग पुलोदचे काय करायचे ? त्याचा निर्णय एकटे उत्तमराव घेऊ शकत नाहीत. पुलोद काही त्यांच्या एकट्याच्या मालकीची नाही, अशा आशयाचेही विधान आदिक यांनी केल्याची बातमी आहे. पुलोदसंबंधी आपल्या भूमिकेचा निर्णय जनता पक्षाच्या कार्यकारिणीलाच घ्यावा लागेल. लोकसभा निवडणुकीत जनता पक्ष आणि त्याच्या मित्रगटांना बहुमत मिळाल्यास जगजीवनराम पंतप्रधान झाले पाहिजेत ही गोष्टही निवडणुकीसाठी जनता पक्षाशी आघाडी करणाऱ्या पक्षांनी मान्य केली पाहिजे. समांतर कॉंग्रेसला हे मान्य असेल तरच महाराष्ट्रात त्यांच्याशी आमची आघाडी होऊ शकेल, असे मत महाराष्ट्र प्रदेश जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. बबनराव ढाकणे यांनी काही दिवसापूर्वी व्यक्त केले होते; पण या अटीचा आग्रह त्यांनी मागे घेतला आहे. अशी अट आगाऊ घालणे योग्य नाही. निवडणुकीनंतर नेता कोणास निवडावयाचे हा संसदेतील पक्षाने किंवा आघाडीने बहुमताने ठरवावयाचा प्रश्न आहे. पंतप्रधानपदावर जगजीवनराम यांचा रास्त हक्क आहे, त्यांना हे पद आतापर्यंत नाकारण्यात अन्याय झालेला आहे हे खरे; पण त्यांच्या नेतेपदाबाबत मित्रगटांना आगाऊच बांधून घेणे योग्य नाही. आपली अट अयोग्य होती हे लक्षात आल्यावर श्री. ढाकणे यांनी त्याबाबतचा आपला आग्रह सोडला असावा असे दिसते; पण ही अट घालण्याची सूचना त्यांना सुचली ती कॉंग्रेस–जनता (एस.) आघाडी बनत असताना झालेल्या हालचालींवरून. चरणसिंगांच्या नेतृत्वाबाबत जनता (एस) ने कॉंग्रेसला आगाऊ बांधून घेतले नसे जगजीवनरामाच्या नेतृत्वाबद्दल समांतर कॉंग्रेसला आपण बांधून घ्यावे असे ढाकणे यांना वाटले असावे. जनता (एस)–कॉंग्रेस आघाडीत चरणसिंगांचे नेतृत्व मान्य करून स्वत:कडे दुय्यम भूमिका कॉंग्रेसने पत्करली यात पक्ष म्हणून कॉंग्रेसची अवस्था किती दयनीय झाली आहे हेच विदारकपणे दिसून येते. या दुय्यम भूमिकेला बंगलोर येथे झालेल्या फूटपूर्व अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीने मान्यता दिली. इंदिरा कॉंग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर अर्स यांनी जुलैमध्ये कॉंग्रेसजनांचा जो मेळावा भरविला होता त्या वेळी सर्व जुन्या–नव्या कॉंग्रेसजनांचा पूर्वीसारखा प्रबळ पक्ष उभारण्याच्या आकांक्षा व अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या होत्या. चरणसिंग गट, जगजीवनबाबूंचा गट, मोरारजीभाईंचा गट या सर्वांनाच आपण पुन: कॉंग्रेसमध्ये आणू अशी स्वप्ने हे नेते पहात होते पण प्रत्यक्षात घडलेल्या घटनांनी त्यांना मोठा हादरा बसला आहे. जनता (एस)तर कॉंग्रेसमध्ये विलीन होत नाहीच उलट कॉंग्रेसनेच त्यांच्यात विलीन व्हावे असा त्यांचा आग्रह आहे. आपले सरकार ज्यांनी पाडले त्यांच्याशी आघाडी मोरारजीभाईंच्या नेतृत्वाखालील संघटना कॉंग्रेसचा गट कसा करील ? ही कल्पना करणेच चुकीचे होते. जगजीवनबाबूंचा गट कॉंग्रेसला मिळेल ही कल्पनाही वस्तुस्थितीचा आधार नसलेले मनचे मांडे होते. जगजीवनबाबूंना आपल्या बाजूस वळविण्याचे इंदिरा कॉंग्रेस गोटाकडूनही प्रयत्न झाले; पण मंत्रिमंडळ बनविण्याच्या हालचालींतील त्यांचे विश्वासघातकी व दगाबाजीचे पवित्रे लक्षात घेता जगजीवनबाबू इंदिरा कॉंग्रेसकडे झुकणे शक्यच नव्हते. पहिल्या बंगलोर मेळाव्याला वसंतदादांचा गट उपस्थित होता; पण दुसऱ्या बंगलोर मेळाव्यापर्यंत ते इंदिरा कॉंग्रेसमध्ये डेरेदाखल झाले होते. अर्सगट कॉंग्रेसमध्ये सामील होण्यापलीकडे बंगलोरच्या मेळाव्यातून कॉंग्रेसचे बळ थोडेही वाढले नाही. कॉंग्रेसचा प्रबळ पक्ष स्थापण्याच्या आकांक्षा याप्रमाणे धुळीस मिळाल्या असून प्रत्यक्षात चरणसिंगांच्या नेतृत्वाखालील आघाडीत दुय्यम भूमिका कॉंग्रेसला पत्करावी लागली आहे.

येत्या निवडणुकीत लोकशाहीवादी गट व्यापक एकजुटीची भूमिका घेऊन इंदिरा कॉंग्रेसला पाडण्याच्या ठाम निर्धारावर उभे राहणार की नाही हा खरा प्रश्न आहे. मुख्य आव्हानाचा त्यांना विसर पडला असून आपसातील हेवे–दावे साधण्याकडेच त्यांचे अधिक लक्ष आहे. जनता पक्ष आणि जनता (एस.) म्हणजेच पक्षफोडे यांचे संबंध एवढे दुरावले आहेत की येत्या निवडणुकीत एकमेकांचा पाडाव करणे हेच त्यांनी आपले मुख्य उद्दिष्ट ठरविले आहे असे दिसते. ते साधण्यासाठी जरूर तेथे इंदिरा कॉंग्रेसची मदत घेण्याचीही त्यांची तयारी दिसत आहे. कोणतेही प्रयास करावे न लागता केवळ जनता पक्षातील फुटीचा फायदा मिळून इंदिरा कॉंग्रेसला आपले बळ वाढविण्याची संधी मिळाली आहे.

हरियानामधील घटना या दृष्टीने लक्षात घेण्यासारख्या आहेत. तेथील निवडणुकांत देवीलाल यांच्या नेतृत्वाखालील जनता (एस) पक्षाचा पराभव करण्यासाठी इंदिरा कॉंग्रेसची मदत घेण्याची भजनलाल यांची तयारी दिसत आहे. आपले सरकार सावरण्यासाठी इंदिरा कॉंग्रेसचा पाठिंबा मिळावा म्हणून त्यांच्या गटाने प्रयत्नही केले. आणीबाणीतील अतिरेकांबद्दल बन्सीलाल यांच्यावर भरलेल्या खटल्यांपैकी चार खटले काढून घेण्याचा निर्णय भजनलाल मंत्रिमंडळाने नुकताच घेतला. पुरेसा पुरावा नसल्याने हे खटले काढून घेण्यात आले. इंदिरा कॉंग्रेसचा पाठिंबा मिळविण्याचा राजकीय उद्देश यामागे नाही असे या निर्णयाचे समर्थन करण्यात येत असले तरी हा निर्णय आताच घेण्याची काय घाई होती ? निवडणुकीच्या मोक्याला असा राजकीय वास येणारे कोणतेही निर्णय घ्यावयाचे नाहीत असा संकेत केंद्र व राज्य सरकारांनी पाळायला हवा; पण तसे काही घडताना दिसत नाही. निवडणुकांवर दृष्टी ठेवून मतदारांमधील काही वर्गांना आकृष्ट करणारे निर्णय घेतले जात आहेत. दारूबंदी सैल करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाबद्दलही असेच म्हणता येईल. निवडणुकीच्या मोक्याला हा निर्णय घेण्याची काय घाई होती ? आचारसंहिता कागदावरच राहते. प्रत्यक्षात ती पाळली जात नाही. ☐

कथा

# इनसायडर

वसंत पासलकर

काही तरी सापडावं अशी इच्छा. दुर्दम्य. किंवा काही तरी हरवल्याची जाणीव. कदाचित दोन्हीही तशा खोटयाच. स्वतःशीच होणारा एक भास. असा त्याचा संशय. पुन्हा तोही तसाच. स्वतःशीच ! मग कुणी तरी टेबलावर वर्तमानपत्र आणून टाकतं. पिवळट रंगाच्या कागदावर काळया टायपातल्या किचकट अक्षरांची प्रेतं. कुठं तरी, कधी तरी घडलेल्या घटना. त्यावर याची–त्याची मल्लीनाथी. संपादकांचीं, पंतप्रधानांचीं. कायदेपंडितांची. पाठीमागच्या पानावर दहाबारा सिनेमावले 'असा न पाहिला न बघाल' म्हणून आपल्या पिक्चर्सची उत्तान पोस्टर्स छापून कोकलत असतात. कोपऱ्यात आकाशवाणीवर अमुक ऐका. दूरदर्शनवर तमुक पहा म्हणत दिग्दर्शन केलेलं असतं. 'अरे, काय ऐका नि पहा ? पोटाची आग विझली तर या बाकीच्या घश्चोट गोष्टी. नाय तर उपयोग काय ? बातम्या ऐकायच्या. जाहिराती बघायच्या आणि पोटात काय ? तर काही नाही ! ह्यॅऽऽ ! त्यापेक्षा 'वॉन्टेड' किंवा 'अपॉईन्टमेंटस्' किंवा लहानछोटया जाहिराती खऱ्या.. वर्तमानपत्राचा खरा उपयोग तेवढाच आणि तोही होत नसला तर सकाळी बसवायला ! घाईच्या वेळी.

'एक पाणी ज्यादा लाव. साथमें दो गिलास पानी.'

समोरच्या टेबलावर एक दारुडा पिऊन बसला आहे. बकाबका वास येतोय. तरी पण त्याचा हेवा वाटतोय. जगाचा राजा असल्यासारखा मस्तीत बिर्याणी हाणतोय. तुपकट बिर्याणीच्या वासानं पोटात भकाभका आग पाझरू लागली आहे. क्षणभर वाटतं, ती बिर्याणीची प्लेट खसकन् ओढून घ्यावी नि गपागपा खाऊन टाकावी. काय होईल जास्तीत जास्त ? मार खायला लागेल. फाशी तर नाही देणार ? अन् समजा दिली तर तेवढा त्रास संपेल. रोज हे असं मरण्याच्या कळा- सोसण्यापेक्षा सालं एकदम काय व्हायचं ते होऊ दे. एक घाव दोन तुकडे.

त्याची नजर पुन्हा बिर्याणीच्या प्लेटकडं गेली. तो दारुडया मन लावून एक हाडूक चघळीत होता. त्या हाडकाच्या तुकडयाकडं लक्ष जाताच त्याला भयानक शिसारी आली. तोंडात थुंकींचा भला मोठा घोट आला. कचाकचा त्यानं पाण्याचा ग्लास रिकामा केला आणि इराण्याचा परंपरागत गरम चहा तोंडाला लावला. लालसर, गोड–कडक चहाची एक रेघ सरसरत घशातून उतरत पिटात गेली. पोटातल्या आगीत एखादी टाचणी टोचल्यासारख्या वेदना झाल्या. तो तोंड वळवून टाचण्या टोचतच राहिला.

आयुष्य म्हणजे रेवडया खाण्यासारखं आहे !

सुरवातीला दोन–तीन खाताना मजा वाटते. कुडुम कुडुम चावायच्या. गुळाची चव जिभेवर घोळवायची. पांढरे तीळ इकडे तिकडे फिरवत चावायचे आणि नंतर संबंध बत्तिशी दुखायला लागते. रस्ता गजकर्ण झाल्यासारखा लांबपर्यंत पसरलेला. अरे, अरे साला, ही काय जिंदगी आहे ?

आपल्याला संगीतकार व्हायचं होतं. तेही जमलं नाही तर गायक. अन् तेहीं नाही तर ? तर काही तरी पण व्हायचं होतं. काय झालो आपण ? काही नाही. धड कारकूनसुद्धा नाही. किराणा मालाच्या दुकानात पावत्या फाडायला आणि हिशोब जमवायला काय असं कर्तृत्व लागतं ? डोकं फुटतं ते नोकरीवर विचार करून. कामातल्या गोष्टींनी डोकं धरलं पाहिजे. मस्तकशूळ उठला पाहिजे.

इथं डोकं धरतं ते गुळाच्या वासानं. हळदमिरचीच्या कडवट वासानं.

'ह्यॅऽऽ ये क्या जिंदगी है ?' दुःख व्यक्त करण्यासाठी राष्ट्रभाषा चांगली.

अन् त्याला वाटतं, आपलं दुःख नवीन नाही. अजिबात नाही. अनेक कथाकादंबऱ्यांत नायक आपल्यासारखाच असतो. बेकार, अर्धवट बेकार. दुःखानं पिचलेला. काहीही मनासारखं न घडणारा. किंबहुना तो विचार एवढयाचसाठी करतो की, त्याविरुद्ध काय घडणार हे कळण्यासाठी ! मग तरी आपण आपलं दुःख ताजं मानतोय हे कितपत योग्य आहे ? त्याला काही तीव्रता आहे की नाही ? त्याला काही अर्थ आहे ? की उगाचंच सगळं !

अरे, म्हणून काय झालं ? कथा कादंबऱ्यात असली दुःखं आली म्हणजे काय ती शिळी होतात ? कुणाला नंतर भोगायला लागत नाहीत ? जरूर लागतात. जरूर ती भोगायला लागतात. आपल्यासारखी. आपण नाही भोगत ? ठीक आहे; पण भोगतो म्हणजे काय करतो ? भोगामध्ये जी सहभागाची कल्पना आहे. जी सेल्फ इन्व्हॉल्वमेंट आहे ती आपल्यात आहे ? नाईलाजानं जे जगावं लागतंय त्याला भोगणं म्हणता येईल का ? नक्कीच नाही.

आपल्याला कदाचित लेखकही व्हायचं असेल ! की कवी ?

छे ! कवी नको. याला आपल्याच मनात उत्तर नाही आणि तरी नको. रस्त्याला फूटपाथचे पोट फुटलेलं आणि त्या पोटावर लव फुटल्यागत दुकानं आणि माणसं. आपण त्या लवीतला एक केस ? फक्त एका केसाएवढी आपली किंमत ? छयाट् ! आपली तेवढीही किंमत नाही. देअर इज् नो व्हॅल्यू अॅट ऑल ! आपली किंमत काय ? आपलं वजन किती ? आपली उंची किती ? पण मी स्वतःला एखाद्या संस्थानिकासारखा 'आपण' का म्हणवतोय ? खरं म्हणजे मी तेवढा खरा., उदाहरणार्थ, आज घरी सगळं संपलं असेल. किरटं पोरगं मांडीवर दाबत बायको खाटेवर बसली असेल. संध्याकाळी काहीतरी सोय करतो म्हणून सांगून आलोय. कसली कपाळाची सोय करणार ? साली जात-पात मानत नाही आपण; पण मारवाडी तो मारवाडीच ! उगाच माडया न् गाडया होत नाही. पुढच्या पगारातले पन्नास रुपये अॅडव्हान्स मागितले तर साला वसकन् अंगावर आला ! 'तुमी शाला काम पार्टटैम करते

अनि पैसा बारबार उचलते. अशा कशा चालेल बावा? अशा नै चालेल आमच्याकडे. न्हावायचा तर न्हावा नायतर तुमी दुशरी नौकरी वघा नी!'

थोतरीच्या! दुसरी नोकरी नाही म्हणून तर तुला इतका मस्का लावतो. नाहीतर तुझ्यासारख्या घाण, तेलकट माणसाकडं खातंसुद्धा लावायच्या लायकीचा नाहीस. साला, पोरी आल्या की लगाबगा काटचावर स्वतः येतो. माल देताना पिशवी धरू लागतो. हळूच छातीवर नजर टाकतो. या वयात मिशीला अत्तर लावतो! आं? अरे, तरी ह्यांचीच भरभराट! आणि बालाजी ह्यांच्याच मागे? अरे, आमचे मराठी देव काय झोपलेत काय रे? एवढचा प्रामाणिकपणे संध्या करतो. पितृश्राद्ध घालतो. रोज सकाळी झाडून सगळ्या देवांची पूजा करतो तरी आम्ही शंखासारखे कोरडेच! मराठी लोकात काय, मराठी देवातसुद्धा धमक नाही हेच खरं! अन्यथा नोकरीसुद्धा देत नाही याचं उत्तर काय?

लोकलचा धाड्धाड् आवाज कानाच्या कडेनं रोरावतो. विचारातून दचकून तो भानावर येतो.

पांढऱ्या ट्यूबच्या प्रकाशात त्याला केविलवाणं वाटायला लागतं. रडायला येईल की काय असं. नेटानं चालतच रहातो. माणसं तुकडचा-तुकडयांनी. कधी एकेकटीच. कधी अजिबातच नाहीत अशी. कधी खूपशी चालत असतात. फिरत असतात. थकल्यासारखी. काही चलाखीत. काही कुजबुजत.

आपण मात्र एकटेच.

पोरगं आणि बायको.

रात्रीची ओलसर हवा. पोपडे आलेल्या भिंती. अवेळी किंचाळून उठणारं कार्ट! यात आपण कुठं असतो? कुठंच नाही.

आपली लायकी जगण्याची नाही. आपण मरायच्या पण लायकीचे नाही आहोत. खरं तर आपण जन्माच्यासुद्धा लायकीचे नाही. मग आपला जन्म का? 'का'ला उत्तर नाही. त्या दिवशी रेडिओवर कधी नाही तो कार्यक्रम मिळाला. म्हटलं, आपल्यात अजून थोडं तरी स्फुलिंग आहे. पण काय केलं आपण? पार घाण करून आलो.

तुझी मतं तुझ्यापाशी. इतरांना त्याच्याशी काही कर्तव्य आहे का? नुकताच एक प्रख्यात बासरीवाला वाजवून गेला होता. तो हल्ली किती घाण वाजवतो, हे त्या प्रोड्यूसरला सांगायची काही गरज होती? वरं, त्यात साला तो त्याचाच मित्र निघाला! म्हणजे आता पुनः तो असेतो चान्स मिळेल ही शक्यता कमीच. तेव्हा तोवर हरीहरी करा.

त्यात नेमकी परवा ती सुंदर पोरगी दिसली. वाटवेच ना ती? वाटवेच. पण हल्लीची कोण? गळयात मंगळसूत्र दिसत होतं. सालीनं ओळखदेखील दिली नाही! पण ओळख तरी कशी देणार म्हणा! हां, आपल्याकडं एखादी गाडी असती आणि मग तिला दिसलो असतो तर गोष्ट अलाहिदा!

एकूण पैशाशिवाय आयुष्याला वजन नाही हेच खरं.

कशाचं तरी वजन पाहिजे. प्रामुख्यानं पैसा किंवा वशिला. आपल्याला तर साले नातेवाईक ओळख देत नाहीत. मग ओळखीचं कोण असणार हे?

जीव वैतागल्यासारखा तो रुळाच्या कडेनं चालला. कुणीतरी बोंबललं, 'अबे, मरनेका है क्या? नीच्चेसे गाडी छूटी ना रे. सिग्नल दिकता नै क्यारे?' दचकून तो जाणिवेत आला. पांढऱ्या प्रकाशात रुळ चकाकत समोरच्या अंधारात कुठंतरी जाऊन अदृश्य झाले होते. त्याच्या भविष्यासारखे. पोटात काहिल पेटल्यासारखी झाली होती न् पायातून पेटके पेटत होते. तरी तो नेटानं पाय उचलीतच होता. गाडीचा कडवट भोंगा ऐकू आला न् दचकून तो जागच्या जागी थांबला. धडाक् धाड् धडाक् धाड् करीत गाडी अंगावरचा पांढरट–पिवळट प्रकाश मिरवीत वेगानं निघून गेली. तिच्या लांब जाणाऱ्या लाल डोळ्याकडं बघत त्याला बायकोची आठवण झाली.

बघावं तेव्हा तुझं थोबाड रडकं. च्यायला, घरात यावं वैतागून तर कधी हसून बघेल तर शपथ.

शिव्या काय देताय घरात? ब्राह्मणाचं घर आहे असं वागा जरा.

खड्डयात गेलं ब्राह्मणाचं घर! ब्राह्मणाला शिव्या देता येत नाहीत का काय? पोटात आग पडली की आपोआप शिव्या सुचतात.

'अहो, पण शेजारची माणसं काय म्हणतील? आं?

काय म्हणायचीत? का त्यांच्या घरी शिव्या नाही देत? की शिव्या येत नाहीत त्यांना? उलट माझ्यापेक्षा जास्तच येत असतील!

पण ते देतात म्हणून तुम्ही देणार हो! कुणी ऐकलं तर काय म्हणतील?

म्हणायचं ते म्हणू दे. आपण कुणाच्या बापाला भीत नाही. चोर आहेत साले सगळे. पदवी घेतलीय ती जाळून टाकतो. राख फासतो तिची आणि तुम्हांला दोघांना ठार मारून जंगलात जातो निघून! नाही तर भोपाळला जाऊन डाकू होतो.

लावलंय काय तुम्ही? उपाशी राह्यलं तर मरत नाही कुणी. दिवसाकाठी एकदा तर जेवतोय ना? उगाच डोक्यात राख घालून घेता सारखी.

गप बस. घरात राहून बोलता येतं असं सगळं. बाहेर जाऊन जरा फिरून ये. मग कळेल किती शिव्या वाटतात ते. लोकांना, जगाला. हो, आता तेवढंच करायचं राह्यलंय मीच नोकरीला लागते म्हणजे तुमचं तरी डोकं शांत होईल आणि या पोराला देऊ अनाथाश्रमात पाठवून. नाही तर कचऱ्याच्या पेटीत टाकून.

दे फेकून. दळिद्र जन्माला आलं तेच भिकारचोट, एवढचात नको म्हणत होतो तर नाही! आई व्हायची घाई झाली होती. मिळतंय का घोटभर तरी दूध? आईच्या अंगात असलं तर त्याला मिळेल ना! बापात पाणी नाही. आईला दूध नाही. मरायचं मग असंच ते!

थोबाड टाकीन फोडून! पाणी नाही म्हणे. मला काय हौस आहे बोंबलत असं फिरायची? पंधरा पंधरा दिवस एक पॅन्ट घालतोय. माझी मला लाज नाही तेव्हा आता तू काढ.!

इतकं काही कौतुक नको स्वःचं. दीड वर्ष दोन साडचा वापरतेय!

नादात तो रस्त्यावर आला. समोरच्या थिएटरवर रंगीबेरंगी प्रकाशझोत पडले होते. ब्रेसिअर आणि नुस्ती चड्डी पहेनलेली कुणी नटी मादकपणे प्रकाशात नहात होती. तिकिटाच्या खिडकीशी माणसं झोंबाझोंबी करीत घुसत होती. लालचावलेल्या नजरेनं त्यानं सगळ्या परिसराकडं पाह्यलं आणि स्वतःची किळस आल्यासारखा पचकन् थुंकला. लिपस्टिक लावलेल्या एका सिंधी बाईनं त्याच्याकडे बघत पाठ फिरवली आणि तो गर्दीतून चालत राहिला.

कुठं तरी अकराचे ठोके पडत होते. भेलकांडल्यासारखा तो जिना चढत होता. कसली तरी ओढ लागल्यासारखा जिन्याचे कठडे दुवेळक्या हातांनी गच्च गच्च धरीत वर चढत होता.

घराचं दार लोटलेलंच होतं. त्यानं दार उघडलं. कंदिलाचा मुडदुसी प्रकाश वाऱ्यावर हेलावला. त्यानं दार लावलं. कपडे काढून फेकून दिले आणि अंगाचा चिकट गोळा घेऊन डुकरिणीची पिल्लं ढुशा देतात तसा बायकोच्या हाडांना लुचू लागला. □

प्रतिभा रानडे



काबूल

# अफगाण लोकांना कलाकारांचं कौतुक असतंच; पण आज या कलाकाराच्या घरासमोर एवढी गर्दी का?

## अहमद जाहीर

सध्या काबूलमध्ये अतिशय तंग वातावरण आहे. बंडखोर आणि सरकार यांच्यामध्ये कुठल्या कुठल्या प्रांतात चालू असलेल्या लढायांच्या बातम्या रोज ऐकू येत आहेत. अफगाणिस्थानातल्या कानाकोपऱ्यात सतत दौऱ्यावर जाणारे लोक गेले ४–५ महिने काबूलमध्येच असतात. कारण तिथं गडबड सुरू आहे. रस्ते बंद असतात. प्रेसिडेंट नूर महमद तराकी, पंतप्रधान अमीन यांची इंपिरिलिस्ट आणि फ्युडॅलिस्टांवर आग पाखडणारी भाषणं, इराण पाकिस्तान यांनी आमच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करू नये म्हणून त्यांना इशारा देणारी आणि बंडखोरांना ताकीद देणारी भाषणं टी. व्ही.वर, रेडिओवर सतत सुरू आहेत. आज अमक्याला पकडलं, उद्या तमक्याला मारलं, अशा बातम्या तर रोजच्या ऐकायला मिळत आहेत. ऑफिसमध्ये काम करता करता एखाद्याला निरोप किंवा चिठ्ठी येते की, 'बाहेर भेटायला कोणी आलं आहे!' तो माणूस बाहेर गेला की सरळ त्याला गाडीत घालून जेलमध्ये टाकतात. नवरा दोन दिवस घरी आला नाही की, बायकापोरांना कळतं की, तो जेलमध्ये गेला आहे. मुकुंदाच्या ऑफिसमधला खोजा अरेफ सांगत होता की, त्याच्या दूरच्या, जवळच्या नातेवाईक कुटंबातील इतक्या स्त्रीपुरुषांना या सरकारने पकडून नेलं आहे की, १५ वर्षांच्या आतली सत्तर मुलं बेवारशी झाली होती. म्हणून मग उरलेल्या लोकांनी त्या मुलांना संभाळण्यासाठी आपापसात वाटून घेतलं आहे.

प्रत्येक मुसलमानाच्या नावामध्ये महमद हे नाव असतंच, असावंच लागतं; पण आता नवीन राजवटीतल्या लोकांनी स्वतःच्या नावातून 'महमद' काढून टाकायला सुरुवात केली आहे. खल्क पार्टीशी आपली जवळीक आणि ईमानदारी दाखवण्याचा हा हुकुमी एक्का ठरला. त्याप्रमाणे बऱ्याच लोकांनी आपल्या नावातून 'महमद' काढून टाकले. अरन्तार महमद जानी हा काबूल म्युनिसिपालिटीमधला एक प्रेसिडेंट. त्यानेही आपल्या नावातले महमद काढून टाकले, सगळ्यांना तसे सांगितले. त्याची टायपिस्ट होती, तिनं एकदा चुकून नेहमीच्या सवयीप्रमाणं 'अरन्तार महमद जानी' हे नाव संपूर्ण टाईप केलं. तेव्हा जानीसाहेबनं सगळं ऑफिस डोक्यावर घेतलं. त्या मुलीला चांगला दम दिला, नोकरीवरून काढून टाकायची धमकी दिली आणि शेवटी तिची दुसऱ्या ऑफिसात त्याच क्षणापासून बदली करून टाकली.

असं वातावरण असूनही रोजचं आयुष्य सुरूच आहे. इथल्या परिस्थितीशी दूरान्वये संबंध असलेल्या परदेशी लोकांचंच नाही, तर अफगाण लोकांचंही रूटीन चालूच आहे. एकच बंधन आहे की, रात्री ११ वाजता कर्फ्यू सुरू व्हायच्या आत सगळ्यांना आपापल्या घरी परतायची घाई असते; पण गेले २–३ महिने तर संध्याकाळी ६॥–७ लाच दुकानं बंद होत आहेत (एरवी ९ वाजेपर्यंत उघडी असतात.) आणि रस्त्यावर शुकशुकाट होतो आहे. असं असूनही त्या दिवशी संध्याकाळी ८ च्या सुमारास ब्रिटिश कौंसिलमधली फिल्म पाहून बाहेर आलो, तर रस्त्यावर खूप गर्दी होती. एका मोठ्या घरासमोर हजार दीड हजार लोक उभे होते. एवढी माणसं होती; पण गडबडगोंधळ बिलकुल नव्हता. लोक कसली तरी वाट पहात होते. प्रकरण गंभीर दिसत होतं. चौकशी केल्यावर कळलं, काबूलपासून ५० कि. मी. अंतरावरच्या सलांगपासवर अहमद जाहीर पिकनिकला गेला होता. तिथं ॲक्सिडेंट होऊन तो जागच्या जागी ठार झाला होता. त्याच्या मृतदेहाची वाट पहात हे इतके सगळे लोक शांतपणानं उभे होते!

अहमद जाहीर हा इथला पॉपसिंगर. तेहतीस वर्षांचा तरुण, देखणा, सुरेख आवाजाचा. त्यानं लहानापासून थोरांपर्यंत, सर्वथरातल्या लोकांना अक्षरशः वेडं केलं होतं. इथं गाणारे पुष्कळ लोक लोकप्रिय आहेत. हिंदुस्थानी पद्धतीचं शास्त्रोक्त, रागदारीचं संगीत गाणारे उस्ताद सरहांग आहेत, आपल्या आईवडिलांच्या कट्टर विरोधामुळे 'नाशनाझ' म्हणजे 'अनाथ' हे नाव घेऊन, आपल्याकडच्या सैगलपद्धतीची गाणी म्हणणारे नाशनाझ आहेत, हंगामा ही गायिका आणि महंमदवली हा गायक यांची जोडी तर अतिशय लोक-

प्रिय आहे. असं असूनही अहमद जाहीर हा सर्वांत जास्त लोकप्रिय गायक. आवाज अतिशय मोकळा, दमदार. हरतऱ्हेच्या मूडमधली गाणी त्यानं गायली आहेत, आपल्याकडच्या किशोरकुमारसारखी; पण याला इथं म्हणतात मात्र 'अफगाण मुकेश.' हा एकदोनदा भारतातही येऊन गेला होता. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जाहीरशहाच्या जमान्यात एकदा असं ठरलं होतं, की राजघराण्याशी कसलाही संबंध नसलेल्या सर्वसामान्य माणसाला पंतप्रधान करावं. तेव्हा अहमद जाहीरचा बाप—काही वर्षे अफगाणिस्तानचा पंतप्रधानही होता. त्यामुळे सध्याच्या सरकारच्या black list मध्ये अहमद जाहीरचं नाव होतं. गेल्या वर्षी उठाव झाला होता तेव्हा त्या दिवशीच याच्या घरावर firing झालं होतं. त्यावेळी याच्या घरातला एक म्हातारा आणि एक लहान मूल ठार झालं होतं. अलीकडे टी. व्ही. वरच याचं दर्शन खूपच कमी झालं होतं; पण तो एवढा लोकप्रिय होता की त्याची गाणी काबूल रेडिओवर नेहमी लागतात.

दुसऱ्या दिवशी सकाळीच माझ्या घरासमोरच्या रस्त्यावरची रहदारी खूपच जास्त वाढलेली वाटली. एरवी हा रस्ता खूपच शांत आहे म्हणून मला जरा शंका आली. अहमद जाहीरचं घर माझ्या घराच्या नंतरच्या रस्त्यावरच आहे. लगेच कपडे बदलून, मुलाबरोबर कोपऱ्यावर जाऊन उभी राहिले. (साडीवाली बाई आजूबाजूला असली की, इथले लोक जरा बिचकतात, आपापसात सुद्धा मोकळेपणानं बोलत नाहीत. शर्ट-पॅन्ट घातली की गर्दीत मिसळून जाता येतं.) अहमद जाहीरचा 'जनाजा' निघत होता म्हणून तो रस्ता बंद करून, trafic divert करून माझ्या घरासमोरून जात होता. आज तर त्याच्या घराभोवती अक्षरशः ८–१० हजार लोक असतील. म्हातारीकोतारी, बायकामुलं तर ढसढसा रडत होती. एक लांबलचक काळीभोर गाडी फुलांनी सजवली होती. त्या गाडीभोवतीनं, घराच्या प्रवेशदारावर संगिनी घेतलेले आर्मीचे लोक उभे होते. दोन्ही खांद्यांवर लांबलचक फिती लावलेला एक आर्मी ऑफिसर लोकांची गर्दी दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. एवढ्यात आतून अहमद जाहीरचा मृतदेह बाहेर आणला गेला. शाळा-कॉलेजात जाणाऱ्या मुली आता आकांताने रडू लागल्या. माझ्या बाजूलाच एक कॉलेजातलं टोळकं उभं होतं. त्यातला एक मुलगा घसा खाकरून, आवंढा गिळून हळूच स्वतःशीच बोलल्यासारखा म्हणाला, 'कसला आलाय ॲक्सिडेंट? या लोकांनी मारलंसुद्धा असेल त्याला. काही नेम नाही.' एकदमच आजूबाजूला चमत्कारिक शांतता पसरली. चपला-बुटांचे आवाज... उगाचच खाकरणं...tense वातावरण.

मग कोणीतरी म्हणालं, 'काय आवाज दिला होता खुदानं.'

'काय करायचं नुसत्या आवाजाला घेऊन? कितीतरी मुलींशी वाईट-वाकडं वागला. किती मुलींच्या आयुष्याची नासाडी केली यानं.' एक वयस्क माणूस म्हणाला.

पुन्हा एकदा शांतता, फक्त हुंदके आणि नाकाचे सूं...सूं...आवाज तेवढे ऐकायला येत होते.

आतापर्यंत अहमद जाहीरचा मृतदेह गाडीत ठेवून झाला होता. गाडीचं दार बंद करणार एवढ्यात आजूबाजूला उभ्या असलेल्या कॉलेजमधल्या मुलामुलींनी आपल्या हातानं सैनिकांच्या हातातल्या संगिनी, मशीनगन्स बाजूला सारल्या आणि पुढे धाव घेतली. कोणी गाडीच्या मडगार्डवर चढलं होतं, कोणी बॉनेटवर चढलं होतं, कोणी टपावर चढलं होतं, कोणी गाडीवरची फुलं काढून घेत होतं, कोणी अहमद जाहीरच्या मृतदेहाशेजारीच बसायच्या प्रयत्नात होतं! रडण्याचे आवाज वाढले होते. क्षणभर ते सगळे पाचपंचवीस सैनिक, तो आर्मी ऑफिसरही बावरून गेला. पण लगेच त्यांनी एकेकाच्या बखोटाला धरून सर्वांना दूर सारलं आणि गाडी सुरू झाली. संथपणानं पुढं सरकू लागली. गाडी आमच्यासमोर आली तेव्हा माझ्या शेजारचा कॉलेजमधला मुलगा सिगरेट ओढत होता, त्यानं हातातली सिगरेट टाकून दिली, मुलींनी तोंडातला च्युइंगगमचा चोथा काढून टाकला. हळूहळू गाडी निघून गेली. आता गर्दीही पांगू लागली. माझ्या शेजारचा कॉलेजच्या पोरांचा घोळका जरा बोलका झाला. एकजण म्हणाला, 'काल रात्री हा मेल्याचं ऐकलं आणि रात्रभर मला झोप आली नाही.'

एक मुलगी म्हणाली, 'मला तर सारखं रडूच येत होतं.'

त्यावर दुसरा एक मुलगा म्हणाला, 'तुलाच काय मलाही रडू येत होतं. मागे तो हिंदुस्थानचा मुकेश मेला होता तेव्हाही मला रात्रभर झोप नव्हती. मुकेशसाठी किती रडलो होतो मी.'

आमचा मुकेश गेला तेव्हा फेडेड जीन्स घालणारी, रॅन्लरचे टाईट टीशर्टस् घालणारी ही अफगाणिस्थानातली कॉलेजात जाणारी पोरं रडली होती! रात्रभर त्यांना झोप नव्हती! माझ्या मनाला काही तरी स्पर्शून गेलं. आता मला रहावेना. माझ्या मोडक्यातोडक्या फारसीमध्ये मी त्यांना म्हटलं, 'आमचा मुकेश तुम्हाला आवडतो तसाच तुमचा अहमद जाहीर आम्हालाही खूप आवडतो. केवढा बुलंद आवाज होता त्याचा. त्याचं ते 'लै लै लै जान जान...' हे गाणं तर फारच छान आहे.'

आता ती सगळी मुलं-मुली माझ्याकडे आत्मीयतेने बघू लागली. लता मंगेशकर, मुकेश यांच्या देशातली एक बाई त्यांच्या अहमद जाहीरचं कौतुक करीत होती, याचं अप्रूप त्यांना वाटलं. तेवढ्यात त्यांच्यातलाच एकजण म्हणाला, 'अहमद जाहीर लोकांचा खरोखरच लाडका होता. केवढी गर्दी जमली आहे बघा ना. उद्या जर रईस-ए-जमुरियत (प्रेसिडेंट तराकी) मेला तरीसुद्धा लोकांची एवढी गर्दी व्हायची नाही.'

हे वाक्य तो बोलला आणि तावडतोब त्याला कळून चुकलं की, नको तेच बोललो आपण. असं काही तरी भयंकर आपण बोलायला नको होतं, चुकलंच आपलं. त्या पोरानं सायकलवर टांग मारली आणि क्षणार्धात तो नाहीसाच झाला. त्याच्या पाठोपाठ बाकीचेही सगळे घाईघाईनं निघून गेले.

मुकुंदा दुपारी जेवायला घरी आला तोही अहमद जाहीरच्या जनाज्याचं वर्णन सांगू लागला. मेनरोड वरून, त्याच्या ऑफिस समोरूनच ती मिरवणूक गेली होती. त्या लांबलचक काळ्या गाडीच्या पाठोपाठ शंभर गाड्या होत्या, २५–३० मोठ्या बसेस होत्या. आणि ही मिरवणूक जसजशी पुढेपुढे सरकत होती तसतसे हॉटेलवाले, दुकानदार आपापले रेडिओ बंद करत होते, आपापल्या दुकानासमोर येऊन उभे राहात होते.

माझ्या मनात आलं, या अफगाण लोकांना कोणत्याही कलाकाराचं विलक्षण कौतुक आहे हे तर खरंच, पण अहमद जाहीरच्या घरा-

समोरची एवढी गर्दी, त्याच्या गाडीपाठोपाठ इतक्या बसेस, गाड्यांमधून जाणारे शेकडो लोक, तो फक्त एक चांगल्यापैकी कलाकार होता म्हणूनच जमले होते का? हे एवढंच कारण असेल का? की आणखीही कुठलं कारण असेल? नकोशा झालेल्या 'सरकारच्या black list मध्ये ज्याचं नाव आहे अशाच्या जनाज्याला एवढ्या मोठ्या संख्येनं जमून या लोकांनी स्वतःच्या मनातल्या भावनांना अस्फूटपणानं उजेडात तर आणलं नसेल? एरवी अगदी नॉर्मल वातावरण असतं तर एवढ्या हजारोंच्या संख्येनं, शाळा कॉलेज बुडवून सुद्धा, एवढे लोक जमले असते का? की कदाचित याही पेक्षा जास्त जमले असते? ◘

# गुलेलाय, अमीना, जरिफा

एखाद्या देशाच्या, तिथल्या समाजाच्या स्वभावाची पारख करायची असेल तर त्या देशातल्या लोकांनी लिहिलेल्या वाङमयाचा अभ्यास करायला हवा. त्या वाङ्मयातूनच त्या लोकांची सुखदुःखं, आशानिराशा, आकांक्षा, ध्येयं, त्यांचे मानबिंदू कळतात. त्यांचे सिद्धहस्त लेखक हे त्या देशाचे भूषण असतात. त्या देशाचा इतिहास, संस्कृती हे कवी आणि लेखकच ताजी ठेवतात. अफगाणिस्थानच्या इतिहासाची आणि संस्कृतीची वाटचाल कुणालाही स्तिमित करते एवढी ती वेगवान आहे. असं असूनही इथल्या लेखक कवींबद्दल मी चौकशी केली तेव्हा अत्यंत घोर निराशा पदरी पडली. इथे पूर्वी होऊन गेलेल्या किंवा सध्या जिवंत असलेल्या, ज्याच्या बद्दल अभिमानानं सांगावं अशा दहा लेखककवींची नावं काही कुणाला सांगता आली नाहीत. आणि जे काही चारसहा लेखक कवी चांगले आहेत ते १५०–२०० वर्षांपूर्वी होऊन गेलेले!

अफगाणिस्थानात फारसी आणि पश्तू अशा दोन भाषा बोलल्या जातात. त्यापैकी फारसी बोलणाऱ्यांची संख्या खूपच जास्त. पण ही भाषा इराणमधून इथं आलेली, परक्यांची भाषा. पश्तू भाषा बोलणारे मूठभरच लोक आहेत आणि तेही दक्षिणपूर्व अफगाणिस्थानात एका ठिकाणीच एकवटलेले. पण पश्तू ही इथली मुळातली भाषा. संस्कृतच्याही अगोदरची. संस्कृत भाषा पश्तूवरूनच डेव्हलप झाली म्हणे. नव्या सरकारने आता पश्तू भाषेला फारसीच्या बरोबरीनं महत्त्व द्यायला सुरवात केली आहे.

पाच हजार वर्षांचा इतिहास असलेल्या या देशात काळाच्या ओघात टिकून राहतील अशी महाकाव्यं लिहिलीच गेली नाहीत. इथे अगदी सुरवातीपासून लोकगीतं, पोवाडे रचले गेले. गायले गेले आणि अजूनही काही टिकून आहेत. काही लोकगीतांमधून झरतुष्ट्राचाही उल्लेख आहे, त्याच्या पराक्रमाच्या गाथा गायलेल्या आहेत, लढण्यातून त्याने मिळवलेल्या विजयाची गाणी अजूनही उत्तर अफगाणिस्थानात टिकून आहेत. त्यानंतर मग बौद्धराजांच्या काळात कोणतं वाङमय लिहिलं गेलं याचा मागमूसही नाही. कारण नंतरच्या मुसलमान टोळीवाल्यांनी सगळं जाळूनच टाकलं. त्यानंतर मग गझनीच्या महमदाच्या दरबारी असलेल्या अन्सारी आणि फिरदौसी या कवींची काव्य प्रसिद्ध आहेत. 'शाहनामा' हे फिरदौसीचं, सुलतान महंमदाच्या गुणगौरवाचं काव्य खूपच प्रसिद्ध आहे.

रबिया बल्खि नावाची एक कवियित्री अकराशेच्या सुमारास होऊन गेली. बल्खच्या राजाची ही बहीण. एका गुलामावर तिचं प्रेम बसलं म्हणून तिच्या भावाने तिला अंधार कोठडीत टाकलं. तिथंच तिनं मनगटाची शीर कापून आत्महत्या केली. तिच्या प्रेम कविता बऱ्याच प्रसिद्ध आहेत. तैमूरलंगाच्या मुला–नातवांच्या काळात, 'जफरनामा' वगैरे त्या त्या राजाच्या गुणगौरवाची काव्यं लिहिली गेली. त्याबरोबरच काही तुर्की, अरबी भाषेतही काव्ये लिहिली गेली.

'पुमेह खजाना' म्हणून आठव्या नवव्या शतकामध्ये रचल्या गेलेल्या पश्तू कवितांचं पुस्तक आहे. जहाँ पहेलवान, शेख रेझा लुडी, अब्दुल महमूद हाशीम हे पश्तू भाषेत लिहिणारे ८ व्या ९ व्या शतकातले कवी. त्यानंतर सतराव्या शतकामध्ये रहमानबाबा आणि खुशाल खान खतक यांची काव्यं प्रसिद्धीला आली. खुशाल खान खतक हा सर्वात मोठा पश्तू कवी. औरंगजेबाविरुद्ध जन्मभर लढला. पण शेवटी पराभव पत्करुन परदेशी होऊन मरून गेला. त्यानं लिहिलेले पवाडे अजूनही गायले जातात. विसाव्या शतकाच्या सुरवातीला जमालउद्दीन अफगाणी नावाचा एक कवी होऊन गेला. ब्रिटिश अफगाण युद्धांची वर्णने त्याने केली आहेत. ब्रिटिशांविरुद्ध बरीच काव्ये रचली. याच्या नावाने एक स्मारकही केले आहे. दोन वर्षांपूर्वी त्याच्यासंबंधी परिषदही झाली होती.

या सगळ्या कवी, लेखकांचं साहित्य आजही वाचलं जातं, गायलं जातं, म्हणजे टिकून राहिलेलं आहे. आणि तरीही 'अक्षरवाङ्मय' या पदाला पोचणारं ते साहित्य नाही. या सर्वांमधून मोठमोठ्या लढायांची वर्णनं आहेत. राजांच्या विजयगाथा आहेत. आपुकमापुकांच्या प्यार मोहबतीच्या कथा आहेत. जयपराजय, द्वेष, सूड, गर्व, इष्क मोहब्बत अशा ढोबळ भावनांच्या आवर्तनातच गुंतलेले ते साहित्य आहे; पण एवढंच आहे. आणखी काहीही नाही माणसाच्या भावनांचे विविधरंगी आविष्कार त्यामध्ये नाहीत. माणसाच्या मनात हजारो परस्परविरोधी विचारांचा उद्रेक नाही आणि मुख्य म्हणजे अनंत काळापासून माणसानं नियतीशी मांडलेलं जे भांडण आहे त्याची जाण नाही.

अमीर हबीबुल्लानं काबूलमध्ये हबीबिया कॉलेज विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच स्थापन केलं तेव्हा त्याने हिंदुस्थानातून शिक्षक प्राध्यापक आणले होते.

हबीब म्हणून मुकुंदाच्या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या इंजिनिअरची गुलेलाय ही वाग्दत्त वधू. तिशीच्या आसपास वय असावं तिचं. ही कथा वगैरे लिहिते म्हणून मुद्दामहून तिला घरी गप्पा मारायला बोलावलं होतं. हिचा काका आणि आजोबाही साहित्यिक होते. आजोबा आता मरून गेलेत, काका खूप म्हातारे झाले आहेत. बरेच वर्षांपासून काही लिहित नाही; पण पूर्वी खूप लिहायचे. उर्दूमध्येही गझल वगैरे केल्या होत्या. हिंदुस्थानातल्या मैफिलींमध्ये भाग घेण्यासाठी २-३ वेळा जाऊन आले होते.

'तू काय काय लिहिलं आहेस ?' मी गुलेलायला विचारलं.

'पूर्वी मी कथा, लेख वगैरे लिहित होते; पण आता लिहीत नाही –'

'का ?'

'एक तर मी लिहिलेल्या गोष्टी छापून येणं महाकर्मकठीण. खूप खटपट करून, काकांचा वशिला लावून छापून आणल्या तरी वाचणारे कमी. त्यातूनही जे वाचतात ते वाचून विसरून जातात. वाचलेल्याला चांगलं, वाईट म्हणायचं – काही तरी चर्चा करायची हे आमच्याकडे नाहीच. मग नर्व्हसनेस येतो की नाही माणसाला ? म्हणून मी आता लिहिणंच सोडून दिलं.' गुलेलायनं अगदी सरळपणानं सांगितलं. तिचे हे खास दुःख होतं. जगभरच्या नवीनच लिहायला लागलेल्या नव्या दमाच्या लेखकांचं खास दुःख.

'इथं मग सध्या मान्यता पावलेले लेखक कोणते ? कोणकोणत्या विषयांवर लिहितात ते ?' मी विचारलं.

'कुठले आलेत मान्यता पावलेले लेखक ! ज्या लोकांना स्वतःची पुस्तकं स्वतःच छापून आणणं–परवडतं तेच लोक लेखक वगैरे होतात पुस्तकात घातलेला पैसा परत मिळवण्यासाठी मग हे लेखक, लोक चवीनं वाचतील असलंच काही तरी लिहितात. म्हणजे इष्कमोहब्बतीची ठराविक दास्तान किंवा राज्यकर्त्यांचं गुणवर्णन. राज्यकर्ते बदलले की त्याचप्रमाणे त्यांच्या लिखाणातही बदल होतो. पूर्वी दाऊदचं कौतुक करणारे आता तराकीचं कौतुक करत आहेत. यापुढे त्यांची मजल जात नाही. फ्रॅन्कॉईझ सागाँ या फ्रेंचबाईच्या A certain smile या कादंबरीसारखी कादंबरी, कथा आमच्याकडे कधीच लिहिली जाणार नाही, की तुमच्या नेहरू–टागोरांसारखे लेखक आमच्याकडे झाले नाहीत, होणारही नाहीत. आमच्या लेखकांना Psychological writing ( हे दोन शब्द तिन इंग्रजीच वापरले होते ) येतचं नाही.'

गुलेलायच्या बोलण्याचं मला अतिशय आश्चर्य, कौतुक वाटलं. ही पुस्तकं तिनं फारशीमध्ये भाषांतर झालेली ( इराणहून आलेली होती ) वाचली होती. तसं म्हटलं तर जे काय चांगलं वाङ्मय, फारसी आणि जगातल्या इतर भाषांतलं – फारसीमध्ये भाषांतर झालेलं इथं वाचलं जातं ते सगळं इराणहूनच इथं येतं. इथं म्हणच आहे की, जेव्हा तत्त्वज्ञान, कला, साहित्य यांची जरूर असेल तेव्हा भारतातून किंवा इराणमधूनच त्या इथं येतात. बाजारात येणारी सगळी मासिकं, साप्ताहिकं, ( स्त्रियांसाठी, मुलांसाठी, सिनेमाची, हिंदी फिल्मसाठी वाहून घेतलेली मासिकंही यात आहेत. )–कथासागर, कादंबऱ्या, काव्य वगैरे नवं-जुनं साहित्य इराणहूनच इथं येतं. इथे स्त्रियांसाठी, मुलांसाठी आणि सिनेमाचे असे प्रत्येकी एक मासिकं चालवलं जातं.

अफगाणिस्तानचे प्रेसिडेंट नूरमहमद तराकी हे स्वतः कथालेखक आहेत. पूर्वी पक्षबांधणीचं काम सूरू होतं तेव्हा त्यांनी इतर लिखाणाबरोबर काही कथा, दीर्घ कथा वगैरे लिहिल्या होत्या. त्या सगळ्या मार्क्सिस्ट मतप्रचाराच्याच आहेत. साहित्यिक गुण कदाचित त्यात कमी असावेत. तरीपण अगदी प्रथमच शहावाद-शहांच्या आणि प्रेमाच्या कथांऐवजी अगदी सर्वसामान्य माणसाची सुखदुःखं, त्याच्या आशा-आकांक्षा यावर कथा लिहिल्या गेल्या, त्याचं श्रेय तराकी यांना द्यायला हवं. त्या वेळी त्यांचं सगळं साहित्य भूमिगत होतं. राज्यक्रांतीनंतर त्याच्या delux copies निघाल्या. काही दिवस बाजारात विकतही मिळत होत्या. आता बंद झाल्या आहेत. आता फक्त पार्टीवर्कर्सकडेच त्याच्या प्रती पहावयास मिळतात. आता तराकी यांच्या कथेवर एक सिनेमा निघण्याची शक्यता आहे.

'तू आमच्या अफगाणिस्थानावर कथा लिहिलीस की नाही ?' गुलेलायनं मला विचारल्यावर मी माझ्या 'परकं रक्त –' या दीर्घकथेची गोष्ट तिला सांगितली. ऐकता ऐकता, कथेच्या शेवटाबद्दल तिला एवढी घाई झाली होती. 'शेवटी शुक्रिया गेली की नाही अमेरिकेला ?' तिनं अधीरपणानं मध्येच दोनदा विचारलं. 'शेवटी शुक्रिया अमेरिकेला निघून जाते...' माझं वाक्य पुरं होताहोताच टाळी वाजवून, चुटकी वाजवून, खुशीत येऊन ती म्हणाली, 'बेस्यार खूब...व्हेरी गुड...जायलाच पाहिजे तिनं.' मग गंभीर होऊन म्हणाली, 'खरं म्हणजे बुरखा घालावा लागणाऱ्या बाईची दुःखं, शुक्रियासारख्या मिक्स्ड-ब्लडच्या आणि जुन्या परंपरागत कुटुंबात वाढलेल्या तरुण मुलींची दुःखं, ही आमची दुःखं आहेत. ती आमची आम्ही लिहिली पाहिजेत; पण आमच्यात कोणी असलं काही लिहीतच नाही. तू तुझ्या कथेची इंग्लिश-फारसीमध्ये भाषांतरं कर ! इथल्या बायकांना वाचू दे जरा...'

मनात आलं की या बायका खरंच का विचार करीत नसतील ? की गुलेलायनं– जसं लिहिणं सोडून दिलं होतं तसं या बायकाही विचार मनात येऊनही जाऊ दे म्हणून सोडून देत असतील ? सर्वसाधारणपणे इथल्या बायका सुरेखच असतात. आता त्या सर्रास शिकायला लागल्या आहेत आणि शिक्षण झालं की– लगेच दुय्यम दर्जाच्या का होईना पण नोकऱ्याही करायला लागतात. नोकरी करणाऱ्या मुलीला लग्नाच्या बाजारात भाव खूप. नोकरी करणारी अफगाण मुलगी अतिशय आत्मविश्वासानं वावरते. आपल्या भारतीय बायकांसारखं शालीनतेचं फालतू प्रदर्शन मुळीच करीत नाही. तरीही जरिफासारखी मुलगी– आपल्या बापाच्या इच्छेविरुद्ध, आपल्या पसंतीच्या मुलाशी लग्न करू शकत नाही.

आणि एखादी अमीना पाहिली की आश्चर्यानं थक्क व्हायला होतं. अमीना रशियामध्ये ८–१० वर्ष राहून शिकून आलेली ड्राफ्टसमन आहे. मार्क्सिस्ट आहे. नवीन सरकार सत्तेवर आल्यावर या पार्टीवर्कर अमीनाचा रुबाब चांगलाच वाढला आहे. ही ऑफीसचं काम जेमतेमच करते, बॉसिंग जास्त करते. ड्रायव्हर्स, चपरासी, कारकून आणि बायकांसाठी मार्क्सिझमचे क्लासेस रोज घेते. पार्टी–मिटिंग्ज घेते. यूरी या रशियन रोड इंजिनिअर बरोबर लग्न न करता त्याच्याशी संसार करते. रशियन आर्किटेक्ट्सचं अफगाणिस्थान-सारख्या गरीब देशाला न परवडणारं, महागडं आणि most unimaginative town planning– यावर भारतीय तज्ज्ञांनी टीक केलेली तिला आवडत नाही. टेक्निकली कोण चूक कोण बरोबर या पेक्षा रशियन्सवर टीका केलेली तिला आवडत नाही. अशी ही अमीना काय किंवा जरीफा काय या मुली विचार करतच नसतील ? की त्यांना मिळालेलं बुरखा न घालण्याचं स्वातंत्र्य, शिक्षण, नोकरी करण्याचं स्वातंत्र्य हे न झगडता; सरकारी धोरणांमुळे मिळालं म्हणून त्यांची विचारशक्तीच काम करीत नाही ? ◘

# इथले हिंदू-शीख भारतीय

सर्वसाधारणपणे अफगाण माणसाला हिंदूंच्याबद्दल, निव्वळ हिंदू म्हणून द्वेष वाटत नाही. काबूल शहरामध्ये दोन हिंदू मंदिरे आहेत, शीखांची दोन गुरुद्वारे आहेत, तिसरा गुरुद्वारा सध्या बांधला जातो आहे. प्रत्येकजण आपापले सण, देवाचे उत्सव वगैरे साजरे करीत असतात.

एक दंतकथा सांगतात, की अब्दूर रेहमानच्याच कारकीर्दीत. काबूल शहराच्या भोवतीनं असलेल्या एका डोंगरावरचं असमाई देवीचं देऊळ मुसलमानांनी पाडलं. तो काळ अतिशय तणातणीचा आणि सारख्या लढाया, मारामाऱ्या यांचा होता. तेव्हा ती देवीची मूर्ती, पडलेल्या देवळातच, पूजाअर्चा न होता उघड्यावरच कित्येक वर्षे पडली होती. एक दिवस अमीर अब्दूर रहमानच्या स्वप्नात देवी येऊन म्हणाली, मी एवढी उन्हातान्हात पडले आहे, तुला बरे दिवस येणार कसे ? अमीर अब्दूर रहमानने त्या स्वप्नाकडे लक्षच दिलं नाही. पण त्याला तेच स्वप्न पुन्हापुन्हा पडू लागल्यावर मग त्याने गावातल्या हिंदूंना बोलावून घेतलं, स्वप्न सांगितलं आणि त्या डोंगरावरची देवीची मूर्ती गावात आणून देऊळ बांधायला सांगितलं, भरपूर पैसाही दिला. तेव्हापासून ते मंदिर गावातच आहे. अट एकच, की मंदिराचा कळस आणि त्यावरचा भगवा ध्वज बाहेरून दिसता उपयोगाचा नाही. पुढे अमानुल्ला राजा झाल्यावर त्यानेही या मंदिराला पैसा दिला होता. जागृत देवता म्हणून इथे नवस वगैरेही बोलले जातात, फेडले जातात, तरीही इथल्या हिंदू-शिखांना दुसऱ्या दर्जाचेच नागरीकत्व आहे. पाकिस्तान झाल्यावर पाकिस्तानच्या खोटया प्रचारामुळे इथल्या लोकांची मनं गढूळली आहेत. तरीसुद्धा भारतामध्ये पाकिस्तानी मुसलमानांच्या संख्येपेक्षा जास्त मुसलमान आहेत आणि चांगले नोकरीधंदे करून राहतात कसे, याचं त्यांना आश्चर्य वाटतं. इतर सगळ्या बाबींप्रमाणे याबाबतीतही आपला प्रचार अतिशय कमी पडतो.

पाकिस्तान झाले तेव्हा पाकिस्तानातले बरेचसे हिंदू शीख अफगाणिस्थानात पळून आले. त्यांच्याकडून पाकिस्तानी अत्याचाराच्या हकिगती ऐकून इथले हिंदू-शीख घाबरले. ते सगळे मग तेव्हाच्या जाहीरशहाकडे गेले आणि त्यांनी स्वतःच्या सुरक्षिततेबद्दल काळजी व्यक्त केली. तेव्हा जाहीरशहाने त्यांना आश्वासन दिलं की, पाकिस्तानात जे घडलं ते इथं घडणार नाही. तुम्ही अफगाण नागरिक आहेत. तुम्हाला दुसरा अफगाण नागरिक हात लावणार नाही, याची जबाबदारी मी घेतो आणि पाकिस्तान एवढ्या जवळ असूनही अफगाणिस्थानातल्या हिंदूंना, शिखांना काहीही त्रास झाला नाही. उलट पाकिस्तानातून इथं पळून आलेल्यांनी मात्र इथं भल्याबुऱ्या मार्गांनी आपलं बस्तान पक्कं केलं. अगदी अलीकडेच प्रेसिडेंट तराकी आपल्या एका भाषणात म्हणाले होते की, 'तीस वर्षांपूर्वी 'डाळरोटी' खाणारे काही लोक (म्हणजे पाकिस्तानातून इथं आलेले) इथे आले आणि आमच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन, आमच्याच लोकांची पिळवणूक करून चांगले गबर झाले. आम्हाला गरीब ठेवून स्वतः मात्र त्यांनी इस्टेटी जमवल्या; पण हे आता यापुढे आम्ही चालू देणार नाही.'

सर्वसाधारणपणे अफगाण माणूस भारतीयांवर चिडतो तोही याच कारणासाठी. अफगाणिस्थानातले जवळजवळ सगळे export import market हिंदूंच्या किंवा शिखांच्याच ताब्यात आहे. हे लोक दोन-चारशे वर्षांपासून इथं येऊन स्थायिक झालेले आहेत. काही १०-१२ हिंदू कुटुंबं फार जुनी, अफगाणिस्थानात इस्लाम येण्याअगोदरपासूनची आहेत. त्यांना आणि बिगर व्यापारी हिंदूंना सरकारदरबारात आणि सामान्य लोकांतही जो मान मिळतो तो भारतातून इथे येऊन स्थायिक आणि श्रीमंत झालेल्या व्यापाऱ्यांना मिळत नाही. नव्या सरकारनं त्यांच्यापैकीच काही हिंदूंना, शिखांना प्रथमच मानाबरोबर अधिकाराच्या ४-६ 'खुर्च्या' दिल्या आहेत. ही प्रथमच घडलेली गोष्ट आहे आणि त्याचा अभिमान अफगाण हिंदूंना वाटतो आहे. इथलं जवळजवळ सगळे money market या लोकांनी काबीज केले आहे. अमाप संपत्ती गोळा केली आहे, त्यांचे मार्ग काही साधे सरळ नाहीत आणि या सगळ्या लोकांकडे अफगाणिस्तानाबरोबरच भारताचेही नागरिकत्व आहे. इथल्या लोकांना माहीत आहे की, उद्या जर या देशाला त्रासाचे दिवस आले तर हे सगळे श्रीमंत हिंदू-शीख आपापला पैसा घेऊन भारतामध्ये निघून जाणार आहेत. त्यांच्या पैशाचा अफगाणिस्तानला किती उपयोग होईल याबद्दल इथल्या लोकांना शंका आहे. म्हणूनच आफ्रिकेमध्ये, पूर्व आशियामध्ये जसे भारतीय व्यापारी त्या त्या देशांना नकोसे झाले आहेत तसेच ते इथेही नकोसे आहेत. आज नाही उद्या या व्यापाऱ्यांना इथून हाकलून दिलं तर आश्चर्य वाटायला नको.

काही अफगाण व्यापाऱ्यांनी भारतीय कारखानदारांशीच direct व्यापार करायचा ठरवला. कारण युरोपिअन वस्तू इथे फार महाग पडतात. त्यामानाने भारतीय वस्तू चांगल्याही असतात आणि स्वस्तही असतात. एका नावाजलेल्या भारतीय वुलन कापडाच्या कंपनीने आणि स्कूटर्सच्या कंपनीने त्यांच्याशी कॉन्ट्रॅक्ट करताना एक माल दाखवला आणि मागून माल पाठवताना कमी दर्जाचा पाठवला. त्या अफगाण व्यापाऱ्याने आपल्या एम्बसीकडे दाद मागितली. एम्बसीने कळवले तुमचे contract चे कागद, टर्म्स, तारीख, रक्कम वगैरेंची माहिती देऊन, ठराविक पद्धतीने अर्ज करा, Copy to company director, copy to foreign ministry, copy to Ministery of Industries...त्याने हा सगळा उपद्व्याप केला. दोन चार महिन्यांनंतर त्याला पोच आली. पुन्हा एम्बसीमध्ये गेला, reminder पाठवा... reminder पाठवला. पुन्हा फक्त पोचच. शेवटी त्या अफगाण व्यापाऱ्याने कंटाळून भारतीय मालाचा नादच सोडून दिला.

ही झाली अफगाण नागरिक असलेल्या हिंदू-शीखांची स्थिती, अफगाण सरकारला आपल्या ज्ञानाचा फायदा करून द्यायला आलेले जे भारतीय तंत्रज्ञ, यंत्रज्ञ आहेत त्यांच्याबद्दलही अफगाणलोकांचे चांगले मत नाही. भारतीयांच्या ज्ञानाबद्दल, कामाबद्दल त्यांना भरपूर आदर आहे. बामियानचे बुद्धावशेष आणि बल्खची मशीद शेकडो वर्षांपासून भंगलेल्या आणि ढासळलेल्या स्थितीत होती. भारतीयांनी

त्यांची डागडुजी करून त्यांना सावरलं, नीटनेटकं केलं याबद्दल त्यांना भारतीयांचे उपकारच वाटतात. भारतीय डॉक्टर्स, शिक्षक, प्रोफेसर्स, इतर तंत्रज्ञ त्यांच्या कामामुळे इथल्या लोकांना हवेसे आहेत; पण असे असूनही भारतीयांच्या इतर वागणुकीमुळे त्यांना भारतीय आवडत नाही. इथे आलेले जवळजवळ सगळे भारतीय सतत imports च्या मागे लागलेले. ऑफिसमध्ये सुद्धा वेगवेगळ्या कंपन्यांचे कॅटलॉग चाळून अमुक फ्रीज, तमुक वॉशिंगमशीन याबद्दल चर्चा सतत चालू असते. अफगाण लोकांना त्यांच्या मागासलेपणाबद्दल, त्यांच्या अस्वच्छतेबद्दल सारखी नावं ठेवायची, त्यांना तुच्छ लेखायचं, या वृत्तीमुळे भारतीय त्यांना नकोसाच वाटतो.

इंदिरा गांधी निवडणुका हरल्या होत्या त्या वेळी मात्र अफगाण माणसाला भारतीयांचे विलक्षण कौतुक वाटले होते. एवढ्या सर्वसत्ताधीश बाईला आपण फक्त मतांच्या जोरावर घालवू शकलो याचं त्यांना केवढं अप्रूप वाटलं होतं! 'सगळ्या जगात भारताएवढा चांगला देश नाही,' 'अत्यंत सुसंस्कृत लोक आहात तुम्ही' (भुट्टोला फाशी दिली तेव्हा) असं सुशिक्षित लोक म्हणाले. तर आमच्या ड्रायव्हरला इंदिरा गांधींच्या मुलाबाळांची काळजी पडली होती! तो म्हणाला, आता तिची प्राईम मिनिस्टरची नोकरी गेली तिची मुलं खातील काय?'

मी म्हटलं, 'अरे बाबा, तिनं भरपूर पैसा केलाय. तिच्या सात पिढ्या खातील एवढा. म्हणून तर तिला हाकललं लोकांनी.' मी आपलं सगळा प्रश्न सोपा करून त्याला सांगितलं. कारण एवढी जबरदस्त बाई अधिकारावरून का जाते हा त्याला प्रश्न पडलेला होता.

'कमाल आहे तुम्हा लोकांची! कुणालाही त्रास न होता तुम्ही सबंध सरकार बदललेत. आमच्याकडे म्हणजे एकमेकांची डोकी उडवल्याशिवाय सत्ताबदल होतच नाही.'

अफगाण आणि भारतीय यांच्या संबंधातली सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अफगाण माणूस भारतीयांना युरोपीय माणसाच्या बरोबरीचा समजतच नाही. भारतीय मात्र स्वतःला तसे समजतात! अफगाण लोकांना वाटतं, जसे आम्ही तसेच भारतीय. उलट आपण मोंगलांना आणि नंतर ब्रिटिशांना शेकडो वर्षं स्वतःवर राज्य करू दिलं म्हणून ते आपल्याला त्यांच्यापेक्षा हिणकसच समजतात.

अफगाणिस्थानने वाटेल त्या मार्गाने—खोटं बोलून, दिला शब्द फिरवून, विश्वासघात करून, कसल्याही तऱ्हेची scruples न बाळगता आणि मुख्य म्हणजे आपलं रक्त सांडून स्वतःचं स्वातंत्र्य अबाधित ठेवलं. १८३९ ते १८४२ चाललेल्या पहिल्या अँग्लो—अफगाण युद्धात अफगाणिस्थानने हजारो ब्रिटिशांना मारलं. फक्त डॉ. ब्रॅडमन नावाच्या एका डॉक्टरला सुखरूप जाऊ दिलं, तेसुद्धा त्याने भारतात जाऊन तिथल्या ब्रिटिशांना युद्धाची सगळी हकिगत सांगावी म्हणून! १८७८ च्या दुसऱ्या युद्धात अफगाणिस्थानला पराभव पत्करावा लागला आणि अब्दूर रहमानला ब्रिटिशांचा पेन्शनर व्हावं लागलं. त्यानंतर १९१९ मध्ये तिसरं युद्ध झालं आणि अमानुल्लाचा विजय झाला. अफगाणिस्थान हे स्वतंत्र, स्वायत्त राष्ट्र आहे हे सगळ्या जगानं मान्य केलं.

या संबंधात एक अनुभव सांगण्यासारखा आहे. इथं एक अफगाण दुकानदार आहे. ४२ वर्षं त्याचं जबलपूरला कापडाचं दुकान होतं. आता म्हातारपणी दुकान बंद करून आपल्या देशाला परत आलाय. हिंदी उत्कृष्ट बोलतो म्हणून त्याच्या दुकानात आम्ही नेहमी जातो. त्याला भारतीय राजकारणाची त्याला चांगलीच ओळख आहे. हल्लीच्या अफगाण, हिंदुस्थानच्या परिस्थितीबद्दल तो एकदा म्हणाला होता, 'आम्ही आमच्या अमीर अमानुल्लाला मानलं नाही, तुम्ही तुमच्या सुभाषचंद्र बोसना मानलं नाहीत, म्हणून आपल्या दोघांच्या राजकारणाचा असा चुथडा झाला आहे. राष्ट्रीय बाण्याच्या आपल्या लोकांना आपण परदेशी केलं कीं, दुसरी राष्ट्रं येऊन आपल्या डोक्यावर बसणारच.'

हिंदुस्थानात साम्राज्य जमवून बसण्याअगोदरपासूनच, या बाजूने ब्रिटिश आणि उत्तरेकडून रशिया यांच्या कात्रीत सापडलेल्या अफगाणिस्थानने सतत दोघांनाही दूर ठेवायचा आटोकाट प्रयत्न केला. पण ब्रिटिशांना त्या वेळी रशियाशी शत्रुत्व पत्करायचं नव्हतं. म्हणून ब्रिटिशांनी अफगाणिस्थानला रशियाविरुद्ध कधीही मदत केली नाही, उलट एकदा तर रशियाशीच बोलणी करून अफगाणिस्थानला अडचणीत टाकलं होतं. प्रत्येक अडचणीच्या वेळी अफगाणिस्थानने मदतीसाठी हिंदुस्थानी ब्रिटिशांकडे मदत मागितली. पण हिंदुस्थानवर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांनी ती कधीच दिली नाही.

आणि आजसुद्धा रशियाचा अफगाणिस्थानवर एवढा कबजा आहे त्याबद्दलही भारतानेच काही तरी केले पाहिजे अशी सुशिक्षित अफगाण माणसाची अपेक्षा आहे! एक वर्षापूर्वी नवीन अफगाण राजवटीला मान्यता देणारे भारत हे रशियानंतरचे दुसरे राष्ट्र. तेव्हा अफगाण माणूस खूष झाला होता. रस्त्यातून जातानाही भारतीयांशी हस्तांदोलन करून भारताच्या मैत्रीबद्दल शुक्रिया अदा केल्या जात होत्या. पण आता तेच लोक म्हणतात, 'तुम्ही कसले आमचे मित्र? रशिया आम्हाला गिळंकृत करतो आहे आणि तुम्ही लोक आम्हाला काही मदत तर करत नाहीच, उलट रशियाशी मैत्रीच आहे तुमची.'

हिंदू—शीख व्यापाऱ्यांनी गैर मार्गाने अनाठायी पैसा साठवला म्हणून त्याबद्दलचा राग, भारतीयांच्या एकंदर वागणुकीबद्दलचा राग, त्यामध्ये आता आणखी हा नवीनच राजकीय सूर मिसळला आहे.

**(बादशहाखान....शेवटचा लेखांक...पुढील अंकी)**

# पुस्तके

मुकुंद संगोराम

## पालव

### एक संवेदनाक्षम आविष्कार

'पालव' हा श्री. किशोर पाठक यांचा पहिलावहिला काव्यसंग्रह. पाठकांच्या कविता यापूर्वीही विविध नियतकालिकांतून वाचकांसमोर आलेल्या आहेत. त्या कवितांचा वारसा घेऊनच किशोर पाठकांनी कविता-संग्रह तयार केला. पाठकांची कविता काहीशी हळुवार, रोमॅन्टिक आहे. त्यांच्या कवितांवर प्रेमाच्या विविध छटांचा एक वेगळाच परिणाम दिसून येतो. एका अर्थी या कविता प्रेमकविताच आहेत; पण प्रेमकवितेशी नाते तोडणाऱ्या, आशय व अभिव्यक्तीच्या वेगळेपणा दाखविणाऱ्या कविताही 'पालव'मध्ये आहेत.

'पालव' या कवितासंग्रहातील कविता वाचल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते ती अशी की यातील कविता एकाच भावावस्थेतल्या आहेत. कवितांचा विषय, त्यांचा फॉर्म यांच्या संदर्भात या भावावस्थेला महत्त्व आहे. बहुतेक कविता रोमॅन्टिसिझमशीं नाते सांगणाऱ्या आहेत, म्हणूनच एका भावावस्थेतील आहेत. हा या कवितांचा एक 'विशेष' ही म्हणता येईल. पाठकांच्या तरल आणि संवेदनाक्षम मनाचे पडसाद या कवितांमधून वाचायला मिळतात.

'तो कविता करायचा
त्याच्या शब्दुलीत नी स्वत:लाच निरखीत
रहायची.
कधी हसायची खुद्कन
...वेलांटीवरून घसरताना'

अशासारख्या कवितांतून किंवा

'म्हणालीस...मला भेट दे !
म्हटलं...मलाच घे !
म्हणाली, नको !
पेक्षा तुझ्यातला तू काढून ठेव
मग स्वीकारीन तुला'

यासारख्या कवितांमधून पाठक आपल्या तरल पण उत्कट भावना शब्दशद्ध करताना दिसतात.

प्रेमकवितेतील ही उत्कटता श्री. पाठक समर्थपणे व्यक्त करतात. या तरलतेला लाभलेला शब्दाविष्कार हा पाठकांच्या कवितेचा दुसरा विशेष. पाठकांची कविता एक उत्कट जीवन जगते.

'लाजणे
रुसणे
हसणे
माझ्या ओंजळीत एक त्रिदल !
तीन पाकळ्या . हव्याहव्याशा !'

किंवा

'मेंदीच्या झाडाखाली तिने रंगण्यांचा हट्ट
धरला.
तो म्हणाला,
तुझ्या हातावर पाने चुरताना माझेही
हात लाल होतील त्याचे काय ?
तो म्हणाली ठीक !'

अथवा

'दूर देशीचा सजण...मला संदेश धाडतो
ओठ जास्वंदी लाजाळू...जीव मायेने
वेढतो–
दूर देशीचा सजण...अंगी खटयाळ
शहारा !
त्यांचे सैल बोलावणे...किती चुकवू पहारा'

अशासारख्या अनेक कवितांमधून ही प्रेमाची उत्कटता, हुरहुर यांचे मोहक दर्शन घडते. म्हणूनच मला पाठकांची कविता प्रेमकविता वाटते.

पाठकांच्या या कवितांचा आणखी एक विशेष जाणवतो तो म्हणजे पाठकांचे भाषा प्रभुत्व. पाठकांची शब्दांवर हुकमत आहे. भाषा त्यांच्या 'हातात' आहे. कारण अशा तरल संवेदना किशोर पाठक अगदी सहज, आणि शब्दसामर्थ्याने प्रकट करतात. त्यांच्या या प्रेमकवितेतील उत्कटता या शब्दांमुळे अधिकच गहिरी झाली आहे.

'...म्हातारीची कोंदट हाक
माझ्या मनात अक्षर झाली
उजेडाची एक तिरीप
तिच्यागालावर सरकत गेली.'

किंवा

'मनाच्या डोहात
टाकला मी खडा
एकही शितोडा उडेचिना–'

किंवा 'थेंब' कवितेतील या ओळी–

'अता कळी
हसे खुळी
कुणी पुसे
कशा मुळे
कशा मुळे
तुम्ही खुळे

तुम्ही खुळे
लाजुनि म्हणते
सजल्या रे
पिवळ्या धम्म
गोजिरवाण्या
किती कहाण्या
किती कहाण्या '

यातील शब्दरचना, त्यांची द्विरुक्ती यातून पाठक आशयाचा नेमकेपणा दाखवितात. ती भावना नेमकेपणे अभिव्यक्त करताना पाठक काहीही हातचे न राखता आपल्याला या शब्दसमुद्रात लोटून घेतात. आणि या संवेदनांना शब्दरूप देतात. त्यांच्या गझलांमध्येही हे दिसून येतं.

या कवितेतील शब्दांबरोबर ज्या प्रतिमांचा वापर पाठक करतात त्या संदर्भातही काही लक्षणीयता आहे. या प्रतिमांबरोबर पाठक काव्यात्मकता लाभलेले अनेक शब्द या कवितांमधून सादर करतात. उदा० शब्दुली, लाजमिऊ डोळे, प्रकाशगति, इ. त्याबरोबरच ज्या प्रतिमांचा वापर ते करतात. त्या मध्येही काही ठिकाणी पुनरावृत्ती आढळून येते उदा० गुलमोहोराची प्रतिमा पाठक कवितांमधून वापरतात, ती त्यांची लाडकी प्रतिमा आहे. या बरोबरच बोटांची मिठी घनदाट, तृप्तीचे शेवाळ, वर्षाधीन, हिरव्याशार डोळ्यांचं समंजस शेत अशा अनेक प्रतिमांनी ही कविता समृद्ध झालेली आहे.

या कवितेत एक भावुकता, भाबडेपणा जाणवतो. हा 'विशिष्ट वयाचा' परिणामही असेल. पण या कवितांमधून त्या विशिष्ट वयातील जाणिवा, संवेदना प्रकट होतात. म्हणून मला ही कविता एका भावावस्थेतील कविता वाटते. ही भावुकता, भाबडेपणा पहिल्या 'प्रास्ताविका'तही 'मी सदैव सर्वांच्या ऋणात' मधून दिसते.

'पाऊस, काही सर्ग काही विसर्ग' या कवितेतील, भाव, अतिशय भाबडे आहेत, तरल आहेत. आणि याचमुळे पाठकांच्या शब्दांना चित्रदर्शित्व लाभते.

'पावसाची लेकरं घरभर...मनभर
भिज्ज...किच्च...ओल तशी कणभर
अशी शिर शिर तुझे स्पर्श आणतात
देहभर...खोलवर'
किंवा
'तुझ्या गालावरच्या खळीत
पाऊस वसतीला थेंब बनून
आणि माझे ओठ पाहुण्यांचे
मी ते भिजत टाकतो तुझ्या खळीत'

या पावसाचे वेगवेगळे संदर्भ या कवितेत दिसतात. कधी अस्तित्ववादाचा, कधी, स्वप्नरंजनाचा, कधी नुसत्या आठवणी तर कधी वास्तववादी अशी पावसाची रूपे या कवितेत पाठक खरोखरच अतिशय उत्कटतेने मांडतात. या कवितेतील काही ओळी...

'तू नकोच ना म्हणूस ढगांचे गाणे
माझ्या वळचणीला किती तरी पक्षी
पंख थरथर ओलावून...'
... ... ... ... ... ...
'पाऊस
गर्भातील अस्पष्ट हालचाल
आणि तुझ्या ओठातील अतृप्त हुंकार
तुझे पान्हावणे'
... ... ... ...
'आभाळाच्या ओव्या ओठातून पसार
भुईवर धारा धुवाधार
तशी तुझी करूणा अपरंपार--'

या अशा कवितां बरोबरच पाठक या रोमॅन्टिसिझम मधून बाहेर पडून काही वेगळा आशय शोधू पहातात. 'दुःख' या कवितेत एका निराशेचं शब्दीकरण करण्याचा प्रयत्न पाठक करतात किंवा 'हॅलो कोण ?' या कवितेत एक ढोबळ उपरोध दाखविण्यांचा प्रयत्न ते करतात, 'आपण कसे' या कवितेत आपल्या अस्तित्वाची तीव्र जाणीव ते करून देतात किंवा आयुष्य 'टेकण्यासाठी' सारख्या कवितांमधून सामाजिक जाणीवेचा आविष्कार पाठक करु पाहतात. गझलांमधूनही हीच धडपड पाठक करतात; पण पाठकांच्या एकूण कवितेशी या कविता कोणतंच नातं सांगत नाहीत. त्या कवितांमधील सामाजिक आशयही तेवढा अर्थगर्भ नसतो आणि त्यामुळे अशा कविता काहीशा उण्या वाटतात.

खरं तर पाठकांची कविता प्रेमकविताच आहे. तिच्यातील निसर्गही दोघांच्या साक्षीनं येतो आणि म्हणूनच त्यांच्या संवेदना निसर्गापेक्षा प्रेमाच्या कहाण्यांना सामोऱ्या जातात. जो निसर्ग या कवितेत दिसतो, तो असा. निखळ निसर्ग कविता इथं नसते. मनाच्या डोहात निसर्गाचं पडणारं प्रतिबिंब श्री. पाठक शब्दबद्ध करतात.

'पालव' मधील कविता वेगवेगळ्या फॉर्ममध्ये वाचायला मिळतात-- या कवितांचा कंटेंट साधारणपणे एक असला तरी निरनिराळे फॉर्म्स पाठकांनी दाखविले आहेत. गझल, मुक्तछंद, अभंग, ओवी असे अनेक फॉर्म या कवितांसाठी वापरत असताना पाठक ज्या पद्धतीने (टायपोग्राफी-कली) ती मांडतात तीही वेगळेपणा दाखविणारी आहे.


'पालव' हा पाठकांचा पहिला संग्रह असला तरी त्यांची कविता याहूनही पुढे गेली आहे. ती यापूर्वीच्या अनेक कवींशी नातं सांगणारी असली तरी तिचं म्हणून एक स्वतंत्र अस्तित्व आहे. ही प्रेमकविता खरोखर उत्कट आहे आणि म्हणूनच ती अधिक भावते.

पाठक हे रोमॅंटिक कवी आहेत. हा धागा त्यांनी जोपासला तर अधिक नव्यानव्या जाणिवांचा शोध त्यांना घेता येईल.

या 'पालव्या' आणखी मोठ्या होवोत मात्र तिचा ताजेपणा आणि हिरवेगारपणा मात्र लोपू नये एवढीच सदिच्छा.

*

पालव (कवितासंग्रह)
किशोर पाठक
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृष्ठे : ५५
मूल्य : ५ रुपये.



# लता

## एक हवी हवीशी न संपणारी मैफल

परवा लताची आल्बर्ट हॉलमधली रेकॉर्ड ऐकत होतो. सुरुवातीला ओंकार नाद उमटला आणि प्रचंड टाळयांचा कडकडाट झाला. ऊरू भरून आलं त्या टाळचा ऐकून. लता परदेशात जाऊन एवढचा टाळचा मिळवते याचं समाधान मनाला मिळत होतं. आणि लताच्या स्वर्गीय आवाजाचं सुख, सारी गात्रं आकंठ पीत होती. लताच्या आवाजाला एक मृदू गंध आहे, एक मऊ रेशमी स्पर्श आहे, मोर पिसासारखा, एक आकार, घाट आहे. या आवाजात सारी दुनिया स्वतःला न्हाऊन घेतीय. खरंच मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही असं नेहमीच आपण म्हणतो. पण मनात मात्र असतं की 'याचि देही याचि डोळा' स्वर्ग अनुभवायला मिळाला तर काय बहार होईल. आणि माणसाच्या निदान भारतीय माणसाच्या मनातली ही सुप्त इच्छा मनकवडचा परमेश्वरानं ऐकली आणि त्याला वरदान देऊन टाकलं. घे ! मी तुला तुझ्याच हयातीत स्वर्गसुखाचं भांडार उघडून देतोय. या कामगिरीवर श्रीमती लतादीदी यांची त्याने नेमणूक केली. छे ! 'श्रीमती ' ' यांची ' असले शब्द लताबाईंच्या बाबतीत वापरताना आपलं काहीतरी चुकतंय असं का वाटतं, काही कळत नाही. लताचा आवाज, लतानं म्हटलेलं गाणं, लताची रेकॉर्ड हेच बरोबर वाटतं. सहज माझ्या मित्राला मी याबद्दल बोललो आणि त्यानं झटक्यात म्हटलं, 'ते रामचंद्रराव, श्रीकृष्णपंत असं आपण राम, कृष्णाबद्दल म्हणतो का ? असा महान आणि असा लहान, म्हणून तर त्याला आपण एकेरी नावानं संबोधतो.'

यात तर शंका नाहीच की देवाघरचं अमाप देणं घेऊन लता या पुण्यपुरातन आर्यावर्तामध्ये अवतरित झाली आहे. काळ, काम, वेगाचे सर्व हिशेब, सर्व बंधनं, सर्व मर्यादा भंग पावल्या आहेत. एक अपूर्व हमेशा हवीहवीशी वाटणारी मैफल अखंडपणे वातावरणात निनादून राहिलेली आहे. शहराचा असा कोपरा नाही, असं गाव नाही जिथं लताचा आवाज ईथर मधून, तबकडीतून आणि...नवशिक्या गायक गायिकांच्या स्वतःवरच खूष होऊन म्हटलेल्या कंठातून प्रकट होत नाहीत. राष्ट्रीय एकात्मतेची समस्या किती कठीण ! जितकं तिच्या बद्दल करायला जावं, तितकी अवघड होत जाणारी. नेते आले आणि गेले पण एकात्मता साधण्यात यश नाही लाभलं त्यांना. पण हे 'प्रभुकुंज, पेडर रोड, मुंबई' इथल्या एका सुरेल कंठाने लीलया साधून टाकलंय. सर्व जाती जमाती, सर्व पक्ष, सर्व भाविक वर्ग, सर्व धर्म, सर्वातील सर्व एका बावतीत अभिमानानं आपली छाती फुगवत असतात ...लता हमारी हैं, हमारे देशकी है ।

### लताचा देश

सगळे भेदभाव, हेवेदावे, स्वार्थ परार्थ या 'आकाशवाणी' पुढे झडून जातात. भानदेखील रहात नाही. ही झाली भारतातली कथा. भारताबाहेरही ही आर्यांची आर्या आमच्या खूप पुरातन बुजुर्गांच्या 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' या स्वप्नाची परिपूर्तीच करीत आहे. सिलोन, पाकिस्तान, अफगणिस्तान, इराण...कुठंही जा...परराष्ट्र दौऱ्यावर गेलेले एक प्रसिद्ध संगीतकार सांगत होते, "जिथं जिथं गेलो तिथं देशाचं नाव सांगताच तुम्ही लताच्या देशातले का ? असा प्रश्न ठरलेला." आणि त्या सिलोन रेडिओला विसरून कसं चालेल. सिलोनचा व्यापार विभाग तर लता–संगीतावरच उभा आहे.

लताबाईचं संगीत हे तसं पाह्यलं तर सिनेसंगीत. शास्त्रीय संगीतापेक्षा त्याची पायरी खालचीच मानली जाणार; पण लताच्या सुवर्ण स्पर्शानं आज सिनेसंगीतही क्लासिकलच्या पंक्तीत दिमाखानं मिरवू शकत आहे. हे मी म्हणत नाही. मी मी म्हणणारे वंदनीय पंडित, उस्ताद यांनी मान्य, नव्हे मुक्तकंठानं मान्य केलंय. पै. बडे गुलाम अली खाँसाहेब रियाझ करत असताना कुठूनशी लताची एक लकेर ऐकू आली, खाँसाहेब न राहवून म्हणाले, 'असा गंधार केवळ दुर्मिळ !'

सध्याच्या संगीताला जे जे लागतं ते सगळं आणि जितकं पाहिजे त्याहून काकणभर जास्त लताच्या संगीतात, गायनात दिसतं. सूर, लय आणि आवाहकता या जर तीन गोष्टी मानल्या तर लताची कुठलीही रेकॉर्ड ऐका आणि याचं प्रत्यंतर पाहा. किती वेगवेगळचा भावना. ता थै या करके आना, मोहे भूल गये सावरिया, दिलका खिलौना हाये टूट गया... नैना बरसे रिमझिम रिमझिम, बरसातमें हमसे मिले तुम सजन, सावरे सावरे (अनुराधातली भैरवी), मीरेची भजने... किती आठवणी करून द्यायच्या आणि करून देणारा मी कोण ? 'लता' हे नाव मनात आल्यावर ही सर्व गीतं मनात गर्दी करून नाही का येत ? तरी पण एक बघाच. बरसात मधलं... 'बरसात में हमसे मिले तुम सजन तुमसे मिले हम बरसातमें' यातला शेवटच्या 'हम' मधली 'म' वरची नादकंपनं ती या एकाच गळचातून बाहेर येऊ शकतील. खरं तर सर्वच गाणी या एकाच गळचातून बाहेर येऊ शकणारी आहेत. तरी लताचं अनुकरण करून तिचीच गीतं सादर केली जात असतातच. असोत. त्यांचंही महत्त्व आहे. लताची उंची त्यांच्यामुळे आणखीनच लक्षात येते. 'बरसात'मधलं गीत. किती जुना चित्रपट. पण गीतं आजही टवटवीत आणि ताजी. त्या जुन्या गीतात लताची जी

हाईट होती ती त्याच लेव्हलवर आजही आपण अनुभवतोय. लताच्या ऐन उमेदीच्या काळात, तिला उमेदी संगीतकार मिळाले. त्या संगीतकारांचा बहर लताच्या आवाजानं मोहरून जायचा. मदनमोहन, शंकर–जयकिशन, एस. डी. बर्मन या सर्वांचाच बहराचा काळ म्हणजे लताचाही उमेदीचा काळ ! हा योग घडून यायला शतकानुशतकं जावी लागतात.

## आवाजाचा कलात्मक वापर

या गीतांमधल्या वेगवेगळ्या भावना, प्रेमाची, अल्लडतेची, विरह वेदनेची, शांत रसाची, अनामिक आनंदाची... एक खासियत आढळल्याशिवाय रहाणार नाही. या भावना जशाच्या तशा आपल्या हृदयापर्यंत पोचतात. याचं कारण संगीताच्या माध्यमाचा बिनचूक, कलात्मक आणि परिपूर्ण उपयोग, जो केवळ लताचा कंठच करू शकतो. सूर असा की ज्यात संगीतातल्या सर्व श्रुती सदेह प्रकट व्हाव्यात. लय अशी की एक पदन्यास (स्वरन्यास ! ) चुकीचा पडेल तर राम की कसम ! भावनेशी अशी एकतानता की तुमची इच्छा असो किंवा नसो ती भावना न कळत तुमच्या हृदयात प्रवेशणारच, मला असं वाटतं की लताबाईंच्या या अखंड गायनातून एक शाश्वत, चिरंतन मैफलच रूपाला आलेली आहे. मैफलीत वेगवेगळ्या भावनांचा आविष्कार वेगवेगळ्या लयकारीतून होत असतो. मैफलीचे नियम असतात. सूर इकडचा तिकडे झाला की 'सूर गया तो सिर गया !' लय हालली, ताल चुकला की जाणकरांची मान डोलणार नाही. लताच्या या मैफलित एकही नियमभंग आपल्याला दिसणार नाही. मैफल रटाळ असून चालत नाही. लताचं कुठलंही गीत ऐका. प्रसन्न प्रफुल्ल, मनसोक्त आनंदानं भरलेला अनामिक अनुभव मिळणारच. खरोखर या स्वर्गीय आवाजाचा हा अनुभव येऊ शकतो.

मैफल गाजवणारे अनेक वंदनीय स्वरसम्राट झाले आणि आहेत. आपल्या मस्तीत ते कलाकार जगत असतात. रसिकांचे कुर्निसात घेत असतात. कधी कधी काहींना अहंभावाचा स्पर्शही होऊन जात असतो. यात वावगं काहीच नाही, मनुष्य स्वभावाला ते धरूनच आहे; पण लताच्या संगीत दरबारात अहंकार, मीपणा, दुसऱ्याबद्दलची कमीपणाची भावना या 'विसंवादी' सुरांना प्रवेश नाही. मान तुकते ती इथंच. खरा भारतीय आदर्श इथंच आहे. म्हणून ही खरीखुरी भारतीय मैफल आहे. ती भारतीयच नाही तर आंतरराष्ट्रीय मैफल आहे. इंग्लंडच्या आल्बर्ट हॉलमधून तिचे निनाद उमटलेत. जगात जिथं जिथं भारतीय आहेत तिथं तिथं लता गाते आहे. ही मैफल अखंड आहे. इंद्रधनुष्यासारखी विविधरंगी आहे. आता लताबाई पन्नासाव्या वर्षांत पदार्पण करत आहेत. पस्तीस वर्षं त्यांनी आपल्या गीतागायनानं सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकलंय. नव्हे, संगीताची आवड लावली आहे.

## २६ तास गाणारा आवाज

लता हा या शतकाचा संदर्भ आहे. लता गाते ती कोटयवधी लोकांसाठी. कोटयवधी लोकांच्या कानात लताचे सूर एखाद्या स्वप्नकमळासारखे उमलताहेत. आपण गात असतो तेव्हा मनांत, कानात लताचाच आवाज गात असतो. त्या गळयाशी एकतानता करण्याचा आपला हा प्रयत्न. पण लता या अनेकांच्या मनातील भावनांना साद घालत असते. लहान मुलं नाच रे मोरा लागलं की नादब्रह्मात जातांत, तरुणाची प्रेमभावना, विरह वेदना, वृद्धांना प्रफुल्लित करणारी भावना लता या एकाच गळयातून साकार करते. त्याला रूप नसतं. ते अनादि–आकार असतं. एक अनामिकता या वातावरणात हे स्वर भरून टाकतात, हे स्वर भूतलावरचे नाहीतच. कोणत्या तरी स्वप्नातले हे सूर आहेत. या स्वरांना आपलसं करून घेण्याचा प्रयत्न आज कोटयवधी लोक करताहेत.

लताचा आवाज हा तुमच्या आमच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक होऊन बसलाय. सकाळी सहा ते रात्री साडेअकारपर्यंत हा आवाज आपल्याला सोबत करत असतो, धीर देत असतो; एक सांगितिक अनुभव देत असतो. हा आवाज दिवसातले २६ तास गात असतो ! खरंतर झोपेतही हाच आवाज आपल्या अवती भवती घुटमळत असतो. तो आपल्या मनातला हृदयातला आवाज असतो.

कलेचा आस्वाद समाजातल्या सर्व थरांतल्या लोकांना घेता आला पाहिजे. आमची चित्रकला, नृत्यकला, शिल्पकला...रस्त्याच्या कडेला बसलेल्या चर्मकाराला, कोपऱ्यावरील फिरत्या गाडीवरच्या पानपट्टीवाल्याला, त्यांचा संदर्भच लागत नाही ही कला त्यांच्यापर्यंतही गेली पाहिजे नाहीतर त्याचा काय उपयोग ? –पण लतानं हे केलंय आज बिडी वळणाऱ्या बायका, चर्मकार, हातगाडीवाले या व अशा अगदी सामान्य थरातल्या आमच्या बांधवांपर्यंत लताने संगीत पोचवलंय.

लताची मैफल हा आत्मसाक्षात्कार. आपण देहभान विसरून या नादब्रह्मात आपल्याला लोटून देत असतो. कोऽहम् ? असा प्रश्न इथं पडतो तो या आत्मसाक्षात्कारामुळे हा आवाज म्हणजेच मी आणि मी म्हणजेच हा आवाज. लताची मैफल कधी न संपणारी. हे सूर आपले सखेसोबती. हवेहवेसे वाटणारे हे सूर या मैफलित आहेत. लताची मैफल म्हणजे 'आनंदाचे डोही आनंद तरंग' लताची ही मैफल म्हणूनच हवीहवीशी आणि न संपणारी अशी आहे.

**–प्रतिनिधी**

**[ २८ सप्टेंबरला लता मंगेशकर यांना पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. ]**

# रंगभूमी

प्रतिनिधी

## मृगतृष्णा

### भडकपणात सवंगपणाची भर

'**मृ**गतृष्णा' हे डॉ. मधुकर तोरडमल यांचे नवे नाटक म्हणजे डॉक्टर चंद्रलेखेंत चांगलेच सेट झाल्याची पावतीच आहे. नाटकाचा काळ आणि विषय पाहिला तर वेगळेपणाचा भास तात्काळ निर्माण होतो. दोन-तीन दशकांपूर्वीचा काळ (चूकभूल द्यावी घ्यावी) निवडताना लेखकानं एकीकडे थोडी 'रिस्क' घेतली– प्रेक्षकांच्या अपेक्षित चौकटीबाहेर जाण्याची –तर दुसरीकडे एक श्रेय (वेगळेपणाचं) मिळविलं आणि आपोआप काही सवलती मिळविल्या. उदाहरणार्थ, 'त्या काळचं घर-वातावरण काय सुरेख उभं केलंय हो,' अशी दाद देणारे बहुसंख्य प्रेक्षक तत्कालीन भाषा मात्र तोरडमलांनी हवी तशी मोडल्यावाकल्याची दखल घेत नाहीत. इतक्या अवघडलेल्या आणि संमिश्र मराठीत या नाटकातली पात्रं बोलतात, की विचारायची सोय नाही. एकच उदाहरण देतो. 'जाणे' या अर्थी 'कटणे' हा शब्द किती वर्षांपासून वापरात आहे असं तोरडमलांना वाटतं? असे भलेभले आधुनिक आणि बोलीशब्दप्रयोग त्या काळात प्रौढ असणाऱ्या पिढीतल्या पात्रांच्या तोंडी वस्ती करून आहेत.

डॉक्टर आणि चंद्रलेखा या विषयावर मी खरं तर लिहीत होतो. डॉ. तोरडमलांच्या नाट्यलेखनात काही ना काही प्रमाणात, एक उग्रपणा, किंचित भडकपणा असतो हे उघड आहे. 'गुडबाय डॉक्टर' हे त्यांचं अलीकडचं गाजलेलं नाटकही पुष्कळांना भडक वाटलं होतं. हा भडकपणा ज्यांना चालतो, किंबहुना क्वचित्प्रसंगी आकर्षकही वाटतो अशांमध्ये माझा समावेश होता आणि याचं कारण असं की त्यांच्या त्या उग्रपणात मनुष्यस्वभावातल्या मानवी आणि पाशवी प्रेरणांचं एक उत्तम एकजीव रसायन मला दिसत होतं. हे रसायन वरवर भडक वाटलं तरी प्रामाणिक वाटत असे; उत्तान, थिल्लर, धंदेवाईक वाटत नव्हतं. वर उल्लेख केलेल्या 'गुडबाय डॉक्टर' या नाटकातल्या डॉक्टरचंच पहा. अतिशय क्रूर, तामसी, सूडानं पेटलेला हा गृहस्थ शेक्सपियरच्या नितांत रमणीय काव्याचा चाहता आहे, त्या काव्यात कुठे तरी स्वतःला शोधतो आहे, हे फार विलोभनीय चित्रण होतं. भोवरा, काळे बेट लाल बत्ती किंवा गुड बाय डॉक्टर यातल्या कुठल्याही नाटकातल्या भडकपणाचं विश्लेषण केलं तर एक रांगडेपणा, नैसर्गिक खडबडीतपणा, एक **primitivism** त्यात प्रामुख्यानं दिसतो आणि काही एका प्राथमिक, शारीर पातळीवर आयुष्य असंही असू शकेल यावर विश्वास ठेवणं कठीण जात नाही.

चंद्रलेखेच्या घट्ट पठडीत उद्भवलेल्या मृगतृष्णेची बाब अशी नाही. इथे आता तोरडमलांच्या स्वतंत्र, उपजतच आक्रमक लेखनशैलीला मोहन वाघ यांच्या सूत्रबद्ध धंदेवाईक निर्मितीशैलीचं रेखीव कोंदण (खरें म्हणजे कुंपण) बसलं आहे आणि वाघांनी आपल्या कलात्मक, उच्चभ्रू आणि शालीन निर्मितीशैलीची रेलचेल करून डॉक्टरांच्या नैसर्गिक उग्रतेला एक झकक, व्यावसायिक सवंगपणा आणला आहे. त्यांच्या नाटकातल्या तशा स्थळांचे (उभयतांनी मिळूनच) धंद्यासाठी expolitation केले आहे, हे येथे जाणवल्यावाचून रहात नाही. तीन उदाहरणं देतो. एक : तिसऱ्या अंकातील चंद्रकांत काळे यांचे ध्यान. दोन : नाटकात वंदना पंडितच्या तोंडी असलेल्या किंकाळ्या, किंबहुना एकूणच ती झपाटली जाण्याचा (कथानकदृष्टचा) वांझोटा (ठरलेला) प्रकार. तीन : चमत्कृतिसंपन्न प्रकाशयोजना. डॉ. तोरडमलांचे या वाघांच्या गुहेत यापुढेही भलेच होईल अशी अपेक्षा बाळगणे अवघडच.

'मृगतृष्णा' ही जाहिरातीत म्हटल्याप्रमाणे तीन पिढ्यांची कुटुंबकथा आहे. बाप विद्वान व सच्चरित ब्राह्मण. धंदा भिक्षुकी. मुलगा फार शिकत नाही; पण अतिविचारी, शंकेखोर, काहीसा संशयवादाने पछाडून किंकर्तव्यमूढ. शिवाय मागे संसार आणि भूतकाळात एक भानगड : एका बालविधवेला यांनी भ्रष्टविले, तिने गरोदरावस्थेत आत्महत्या केली. नाटकाच्या शेवटाशी हे गृहस्थ (बापूराव : चंद्रकांत काळे) वेडे झाल्याचे दिसते, त्यांचे पिताजी स्वर्गवासी झाल्याचे आणि लहान मुलगा काहीसा छंदी असल्याचेही दिसते, म्हणजे पुढेही प्रश्नचिन्हच ! अर्थात मुलाची केस फार गंभीर नसावी. याशिवाय बाकीची पात्रे दुय्यमच. म्हणजे बापूरावांची पत्नी, बहीण व मेहुणे. बहीण व मेहुणे हे जोडपे नाटककार यांनी आपल्या सोयीखातर कसेही राबविले आहे. बापूरावांचे

सासरे (कलाकार– चंद्रकांत गोखले) यांनाच थोडेफार महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. तथापि ही व्यक्तिरेखा अगदी सपाट व एकसुरी असून, वेळ सापडेल तेव्हा बापूरावांशी त्यांच्याइतक्याच शब्दाळ भाषेत गप्पा ठोकण्याव्यतिरिक्त आणि त्यांची वकिलीरदबदली इतरांपाशी वेळोवेळी करण्याव्यतिरिक्त सासरेबुवास काम नाही. बापूरावांची तथाकथित प्रतिभा म्हणजे शब्दांनी लिडबिडलेला सर्वसामान्य शंकाप्रवाह. त्यात वरील मंडळींना विशेषत: सासरेबुवांना genius कुठे व कसा सापडतो हे कोडेच. बरे, बापूराव हे सामान्यच आहेत, हे कळल्यानंतरही ते सत्य पुरेशा प्रभावीपणे व तातडीने पोचविण्याची तसदी कुणी का घेऊ नये, हे कळत नाही.

नाटकाची गती ही सर्वस्वी एकपदरी असून बापूरावांची कर्मकटकट, त्यांच्या पिताजींचा दुर्वासावतार व शांतिब्रह्म सासरेबुवांचे समजूतदार प्रवचन हा नाटकीय घटनांचा मुख्य साचा/आत्मा बनतो. या परिस्थितीत नाटक अखेरपर्यंत पाहणे शक्य होते ते डॉक्टर तोरडमल यांच्या ( भूमिका :– बाप–इ–बापू ) प्रभावी आणि पुष्कळशा संयत अभिनयानेच होय. डॉक्टरांनी या भूमिकेत केलेला आवाजाचा वापर ही नाटकातल्या वैयक्तिक अभिनयातली एक (मेव) आल्हाददायक बाब. प्रथमच हौशी/प्रायोगिक रंगभूमीवरून व्यावसायिक रंगभूमीवर संधी मिळालेले श्री. चंद्रकांत काळे ( बापूराव ) यांची भूमिका म्हणजे महानिर्वाणछाप संवादफेक, वेगम बर्वेछाप हालचाली आणि यावर चंद्रलेखाछाप धंदेवाईक झिलई यांचा त्रिवेणीसंगमच होय. अन्य कलाकारांपैकी श्री. चंद्रकांत गोखले यांचाच उल्लेख पुरेसा आहे. निर्माता श्री. वाघ यांच्याकडे रंगमंचीय वस्तुविशेष (स्टेज प्रॉपर्टी) आणि तन्हेतन्हेचे छानबाज दिवे यांचा बिलकुल तुटवडा नाही, हे मृगतृष्णेने सिद्धच केले आहे. भडकपणात सवंगपणाची भर पडली असता रसायन नासते ही या नाटकाने सिद्ध केलेली दुसरी गोष्ट !

## रंगदीप एकांकिका स्पर्धा

### हौशी कलाकारांमधील चुरस

रंगदीप या पुण्यातील हौशी नाटचसंस्थेच्या पाचव्या वर्षीच्या एकांकिका स्पर्धा दि. १७ ते २१ सप्टेंबरला भरत नाटच मंदिरात पार पडल्या. वीस स्पर्धक संघांनी प्रत्यक्ष एकांकिका सादर करून हजेरी लावली. उल्लेखनीय फक्त सातच. यावरून स्पर्धेच्या दर्जाविषयी अंदाज यावा. आयोजक संस्थेचे ध्येय ‘ हौशी कलाकार आणि नाटच प्रेक्षक ह्यांचं नाटचवेड जोपासणं ’ हे आहे. स्पर्धेपेक्षा ‘ महत्त्व एकांकिका सादर करण्याच्या धडपडीला, नाटचवेडाला ’ आहे. आयोजक संस्था स्पर्धेच्या दर्जाचा प्रश्न टाळण्याचा प्रयत्न करीत आहे. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्रीमती माई भिडे, गो. गं. पारखी व विनायक देवरूखकर यांनी काम पाहिले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे लागला :

उत्कृष्ट एकांकिका प्रथम : अभिनव कला मंदिर सातारा : घोटभर पाणी.

द्वितीय : बालरसिक रंगभूमी, पुणे : हलाहल.

तृतीय : भरत नाटच संशोधन मंदिर, पुणे : रक्तपुष्प.

उत्कृष्ट दिग्दर्शन : घोटभर पाणी : सुनील कुलकर्णी.

उत्कृष्ट स्त्री कलाकार : स्मिता ओक– रक्तपुष्प–पद्मा.

उत्कृष्ट पुरुष कलाकार : १ ) दीपक जोशी–बारा पस्तीस–तो, २ ) प्रभाकर वाळके–हलाहल–राजा, ३ ) इन्द्रायणी इनामदार–नाटक बसते आहे–चमेलीबाई.

प्रशस्तीपत्रके : १) नरेंद्र डोळे २) नितीन पुराणिक ३ ) श्रीराम पोंक्षे ४ ) रत्नामाला डांगे ५) दिलीप बर्वे ६) अंजली पानसे.

स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचा समारंभ दि. २१ रोजी श्री. बाबा ओक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. एकांकिकांची संख्या वाढत असून स्पर्धेच्या तळमळीचा अभाव असल्याचे सांगून स्पर्धेच्या किमान मूल्यांच्या जोपासनेची आवश्यकता त्यांनी पटवून दिली.

या स्पर्धेत ज्या एकांकिका उल्लेखनीय ठरल्या त्यामध्ये प्रथम क्रमांक विजेती ‘ घोटभर पाणी ’ ही अभिनव कला मंदिर, सातारा यांनी सादर केलेली प्रेमानंद गजवी यांची एकांकिका सर्वांगाने इतरांपेक्षा सरस ठरली. खेडचातील अस्पृश्यांच्या पाण्याच्या समस्येची भयानकता प्रेक्षकांपर्यंत पोचविताना लेखकाने, ओठाशी आलेले घोटभर पाणी लाथाडणाऱ्या सत्तापिपासू राजकारण्यांचे यथार्थ चित्रण केले आहे. दलितांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना मदतीचा हात पुढे करण्याऐवजी त्यांचा अनन्वित छळ करून मूलभूत गरजांपासून वंचित ठेवून त्यांचे शोषण करणाऱ्यांवर आंतरिक तळमळीचे कोरडे ओढणारी ही एकांकिका. या एकांकिकेकरिता उत्कृष्ट दिग्दर्शनाचे बक्षीस मिळविलेल्या सुनील कुलकर्णींनी समूहदृश्याचा वापर करून योग्य परिणाम प्रेक्षकांपर्यंत पोचविला. त्यांनी पाटलाचे कामही छान केले. मकरंद ब्रह्मेंची प्रकाशयोजना प्रयोगास पोषक होती. खटकलेली गोष्ट एकच– प्रयोग हा पूर्णपणे माइम पद्धतीने सादर करण्याचे ठरविल्यानंतर मधेच एका सीनकरता थैल्यांचा वापर न पटण्यासारखा होता, त्याचेही माइम करणे आवश्यक होते.

प्रतीक थिएटर्स, वाई यांनी सतीश आळेकरांची ‘ यमूचे रहस्य ’ सादर केली. यमू नसलेल्या पति-पत्नीच्या काल्पनिक भावविश्वाचे दर्शन घडविणारी ही एकांकिका. दिग्दर्शक सतीश खरे यांनी प्रयोग नेटका बसवून कामही छान केले. त्यांच्यावरोबर काम करणाऱ्या कु. प्रतिभा प्रभुणे यांनीही जाणीवपूर्वक काम केले. माइम दृश्ये अचूक झाली असती तर एकांकिका सुबक ठरली असती. स्टेजचा कमीत कमी वापर हा यांचा आणखी एक दोष होता.–‘ व्याप कुणाचे ताप कुणाला ’ ही वसंत कानेटकरांची विनोदी एकांकिका गतजन्मीचे स्मरण-विस्मरण या विषयावरील होती. नातसून म्हणून घरात आलेली नववधू गतजन्मीची आपली पत्नी असल्याच्या सर्व आठवणी सांगून घरात गोंधळ उडवून देणाऱ्या आजेसासऱ्याची ही कथा. दिग्दर्शक कळमकर यांनी प्रयोग छान बसविला होता. बाळासाहेबांची भूमिका करणारे राम पोंक्षे प्रशस्तिपत्रक घेऊन गेले.

मेंदूवर परिणाम झालेल्या वेडयास एका ठराविक गोष्टीची सवय लावून त्याआधारे त्याच्याकडून कोणतीही गोष्ट सहज करवून घेता येते. अशा प्रकारे प्रयोग करणाऱ्या मानसशास्त्राच्या प्राध्यापकाने आपल्या वेडयाभावाकरवी बेताल वर्तन करणाऱ्या आपल्या पत्नीचा खून करवून घेतल्याची कथा श्रीनिवास भणगे यांच्या ' फोन करण्यापूर्वी ' मध्ये सांगितली आहे. दिग्दर्शक जयंतकुमार त्रिभुवन यांनी प्रयोग चांगला बसविला होता. नेपथ्य रचना सुरेख असूनही कलाकार भिंतीतून ये-जा करत होते. मीरा देवल यांची स्टेजवरील हालचाल सहज होती. कलाकारांचे आवाज, संवादफेक व प्रकाशयोजना या गोष्टींकडे दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे ही एकांकिका कोणताही परिणाम साधू शकली नाही. प्रशस्तीपत्रकास पात्र ठरलेले नरेंद्र डोळे यांनी प्राध्यापकाचे काम केले.

यंदाच्या पुरुषोत्तम करडक स्पर्धेतील सांघिक द्वितीय पारितोषिक विजेती ' परस्पर पावणेबारा ' ही पद्माकर गोवईकरांची एकांकिका किर्लोस्कर कमिन्स आर्ट सर्कल पुणे यांनी सादर केली. स्त्री कलाकार सर्व शाहू महाविद्यालयाचेच होते, तर एकूण प्रयोग हा पुरुषोत्तमच्या प्रयोगाची सही सही नक्कल होती. बापूरावाचे काम करणारे दिलीप बर्वे यांना प्रशस्तीपत्रक मिळाले.

बालरसिक रंगभूमी, पुणे यांनी प्रा. दिलीप परदेशी यांची ' हलाहल ' ही तात्पर्य एकांकिका सादर केली. दैनंदिन धकाधकीच्या जीवनात मनुष्यप्राणी दिशाहीन भटकत आहे आणि अनेक मार्गाने सामाजिक मंथन करण्याच्या प्रयत्नात आहे, करणे चालू आहे. अशा वेळी आशावादावर विश्वास टाकून एक दिवस नक्की काही तरी चांगले घडू शकेल या हेतूने चालू असलेल्या प्रयत्नांचे प्रतीक म्हणजे ' हलाहल.' दिग्दर्शक सतीशचंद्र साने यांनी प्रयोगात वापरलेले ' हलाहल 'चे प्रतीक छान होते. लोकनाट्य प्रकाराने प्रयोग सादर करताना तो कुठेही कंटाळवाणा न होण्याची खबरदारी त्यांनी घेतली. महाराजाचे काम करणारे प्रभाकर वाळके यांनी आपली भूमिका अत्यंत सहजतेने केली. त्यांना उत्कृष्ट पुरुष कलाकाराचे द्वितीय पारितोषिक मिळाले. सर्व पात्रांच्या हालचालीत सहजता होती तर प्रत्येक पात्राने आपल्या आवाजाचा योग्य वापर करून एकांकिकेस उठाव आणला. पार्श्वगीत व संगीत यांचा सुयोग्य वापर आणि प्रकाशयोजनाही आकर्षक होती.

मुद्दाम ओढून ताणून आणलेले चावट विनोद व थोडेफार संहितेबाहेरचे संवाद ही गोष्ट खटकणारी होती तर पुष्पा लोखंडे अनावश्यक हसत होत्या. एकांकिका प्रेक्षकांची दाद घेऊन गेली, यातच सर्व झाले. शेवटच्या दिवशी शेवटची एकांकिका भरत नाटयसंशोधन मंदिर, पुणे यांनी सादर केली. महेश एलकुंचवर यांच्या सुरेख एकांकिकांतील सर्वोत्कृष्ट एकांकिका म्हणून जिचा उल्लेख करावा लागेल ती ' रक्तपुष्प ' ही एकांकिका दिग्दर्शित करताना रघुनाथ भाटे यांना एकांकिका नक्की कुठे एडिट करावी हे लक्षात आले नाही. त्यांनी एकांकिकेचा गाभा असलेल्याच दोन सीनला (पद्मा–राजा व राजा-निलू) कात्री लावून कणाच मोडला. एकांकिकेचा तोल गेला. त्यामुळे बाकी स्क्रिप्टचा वापर वातावरण निर्मितीसाठी झाला. त्यातून बाहेर काहीही येऊ शकले नाही. कलाकारांनी ही एकांकिका उचलून धरली, स्मिता ओक यांनी आपल्या संयमित अभिनयाने. स्त्रीत्व संपलेल्या व त्याचवेळी आपली मुलगी पूर्ण स्त्री झाल्यामुळे चिडचिडया बनलेल्या पद्माची व्यक्तिरेखा अचूक उभी केली. परिस्थितीला सामोरा जाऊ न शकणाऱ्या हताश भाऊचे पात्र विश्वनाथ लिमये यांनी जिवंत केले. नेपथ्य ठीक असले तरी प्रकाशयोजना प्रयोगाशी नातं जोडणारी नव्हती.

हे झालं सात एकांकिकांबद्दल. आता उत्कृष्ट पुरुष कलाकाराचे बक्षीस ज्यांना दिले गेले त्या दीपक जोशींनी काम करताना भूमिकेचा विचार, स्टेजचा वापर, हालचालीतील सहजता अभिनय, आवाजाची जात, संवादफेक, लाईट घेणे वगैरे गोष्टीचा विचार केल्याचे त्यांच्या कामात जाणवत नव्हते, तरीही बक्षीस मिळण्याचे कारण प्रेक्षक समजू शकले नाहीत. द्वितीय पुरुष कलाकाराचे बक्षीस मिळालेले प्रभाकर वाळके हे त्यांच्यापेक्षा निश्चितच सरस होते. तुलनात्मक विचार करता स्टेजवरील सहज हालचाल व आवाज, संवादफेक या प्रमुख गोष्टींकडे दीपक जोशीनी लक्ष दिल्याचे जाणवत नव्हते.

एकूण स्पर्धेचा विचार करता स्पर्धकसंघ व दिग्दर्शक हे संहितेवर फारसा विचार करत नसल्याचे स्पष्ट दिसते. संहितेची मागणी व प्रयोगात वापरलेले नेपथ्य, ड्रेपरी याचा मेळ जुळत नाही. प्रयोगात वापरण्यात येणाऱ्या प्रॉपर्टीची संवय केली नसल्याने काय घोळ होतात ते अशा वेळी पहायला मिळते. पार्श्वसंगीत व प्रकाशयोजना ह्या दोन्हीकडे अतिशय दुर्लक्ष केले जाते. आयत्यावेळी उपलब्ध असलेल्या पार्श्वसंगीताचा अनेकदा गैर वापर करण्यात येतो तर लाईट प्रॅक्टीस न मिळाल्यामुळे कलाकार गोंधळात पडतात. ड्रेपरीसाठी किंवा सेटसाठी चांगल्यापैकी खर्च करणाऱ्या संस्था प्रकाशयोजना व पार्श्वसंगीत या गोष्टीकडे का दुर्लक्ष करतात हेच समजत नाही.

– शरद पायगुडे




विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

विदेशी चित्रपट । अशोक प्रभाकर डांगे

# डिअर डेर्सु

## एका निसर्गपुत्राची शोकांतिका

डिअर डेर्सु,

हे अनावृत्त पत्र मी तुला लिहितोय म्हणण्यापेक्षा तुझ्या स्वर्गस्थ आत्म्याला उद्देशून लिहीतोय असं म्हणणंच अधिक संयुक्तिक होईल. अर्थात असं लिहितानादेखील आत्माबित्मा अशा बनेल भाकडकथा माझ्यासारखा सैनिकी पेशाचा सरळ माणूस एरवी जरी मानत नसला तरी तुझ्यासारख्यासाठी ते तसं मानून घ्यायलाच नव्हे, तर आपला जीव देखील गहाण टाकायला तयार असेल याची निश्चितच खात्री बाळग; पण दुर्दैवानं तू देखील आता त्या 'गहाण टाकण्याच्या' टप्प्याबाहेर कधीच जाऊन पोहोचला आहेस. जीवन ते नगण्य ह्यासारखे एरवीचे चलनी शब्द आता तुझ्यासाठी निरर्थक ठरणार आहेत.

डेर्सु, तसा तू तरी माझा असा कोण लागून राहिला आहेस ? ना नात्याचा, ना गोत्याचा, ना वंशाचा, ना धर्माचा. मीं एक रशियन सैनिकी अधिकारी, तर तू सायबेरियाच्या उत्तरेला वस्ती करून राहिलेल्या टोळीतला एक रहिवासी अगदी जपानच्या सीमेकडचा माणूस-अनेक वर्षं फासेपारध्याचं काम करताकरताच त्या गर्द जगली भागाला सहज सरावलेला. त्या उलट मी मात्र तिथे अगदी नवखा काही सर्व्हेअर्सच्या पथकाचं नेतृत्व करताना तिथवर जाऊन पोहोचलेला तिथलं भीषण डोंगरदऱ्या निबिड रान, जीव घेणे प्रवाह या साऱ्यांनी भेदरून गेलेला आणि सर्वेक्षण मोहिमेच्या एकूण यशाबद्दलच विलक्षण साशंकता बाळगणारा अशाच स्थितीतच डेर्सु, अगदी अवचितच तू आम्हाला भेटलास! आणि आपल्या भेटीचा तो प्रसंग तरी किती भीषण आणि नाटयपूर्ण झाला होता ! जवळजवळ तो सारा दिवस त्या जंगलात तू आमच्या पाळतीवर राहिलास आम्हाला कसलीच जाणीव न देता. मग, मग भर रात्री माझं थकलं भागलेलं सैनिकी पथक दाट रानात पहुडलं होतं, शेकोटीही रसरशीत काळोखात पेटून उठली होती, मी बसल्याबसल्याच माझी नेहमीची दैनंदिनी भरून काढत होतो. आणि नेमका त्याच वेळी पाचोळा वाजला. आम्ही क्षणात सावध झालो बंदुका सरसावल्या, पाठीवर भला मोठा बिस्तारा बांधलेली, कमरेत चांगलीच कललेली तुझी खुजी आकृती त्या धूसर लाल प्रकाशात आम्हाला तर चांगली अस्वलासारखी भासली. डेर्सु, खरं तर तुझ्या आयुष्याची दोरीच ताठ, माझ्या सहकाऱ्यांना मी वेळीच आवरलं. त्यांनी बार काढला नाही ! म्हणूनच मग तू निश्चितपणे हातातली रानकाठी टेकत टेकत पुढे झालास आणि सरळ आम्हाला येऊन मिळालास.

डेर्सु, एका बैठकीतच आपलं नवं नातं जुळून गेलं. आपण बऱ्याच गप्पा गोष्टी केल्या, आपणा दोघांची नाडी जुळून गेली. लाकडी कटोऱ्यातनं तू आम्ही दिलेलं अन्न देखील चाटून पुसून खाल्लंस आणि आणि आमच्याच घोळक्यात तू देखील निर्धास्त मनानं झोपी गेलास. डेर्सु, तुझी उपयुक्तता, तुझं शहाणपण मला तुझ्या शब्दातून चक्क लख्ख जाणवलं होतं; पण माझ्या सहकारी मित्रांना मात्र तुझा विश्वास येत नव्हता. तुझ्यावर विसंबून रहायला ते तर मुळीच तयार नव्हते. त्यांचं न जुमानताच मी तुला आमचा वाटाड्या ठरवून टाकलं. पण तेव्हा देखील मी एक आगळा-वेगळा मित्र आयुष्यात जमा केला आहे, हे मला जराही जाणवलं नव्हतं.

डेर्सु, आजदेखील मला तो क्षण ती गर्दगार झाडी, रसरसती नारंगी शेकोटी, श्वापदाचे पार्श्वसंगीतासारखे हुंकार, तुझा बांबूचा लांबलचक पाईप, शुभ्र दाढी, लांब लोंबत्या मिशा आणि ते लहानसे लुकलुकते पाणीदार पारदर्शी डोळे, लाल गोबरे गाल. खुजा देह, त्यावरचे ठिगाळलेले कपडे, सारं काही एखाद्या देखण्या चित्रासारखे स्पष्टपणे समोर दिसत रहातं. मी तुझं नांव विचारलं, तर खोल, घोगऱ्या पण मोजक्या दोनच शब्दात तू उच्चारलास 'डेर्सु उझाला.'

डेर्सु, विसावं शतक नुकतंच कुठे उजाडत होत आणि सायबेरियातल्यां मोजणी मोहिमेत आता आमच्या पथकाचं धुरिणत्व जणू आता मी तुलाच बहाल करून टाकलं होतं. पुढच्या काही दिवसांत आम्ही तुला जे पाहिलं तुझ्यावरोबर अनुभवलं ते सारंच काही विलक्षण थरारकही होतं. डेर्सु, तू खरोखरच त्या संपन्न सृष्टीचा नायक म्हणूनच वावरत होतास, शोभूनही दिसत होतास. तू 'निसर्गाचा पुत्र' म्हणवून घ्यायलाच लायक होतास. आकाशाचं छत पांघरून भुईच्या कुशीत निर्मळ मनानं विसावत होतास. ते संपन्न-डोंगर, नि हिरव्या-पिवळ्या पानांनी नटलेली समृद्ध रानं, ती बहुरंगी श्वापदं, ते बहुरंगी चित्रविचित्र पक्षी खळाळून वहाणारे निरागस प्रवाह, खरं तर हेच सारे तुझे सगेसोयरे होते. त्यांच्याशीच तुझी कुठे तरी बांधिलकिही होती. ह्या निसर्गाशीच तुझं एक घट्ट नातं जुळून आलं होतं. इथल्या उन-सावल्यांची घडयाळं तुला तोंडपाठ होती. इथल्या पावसांची प्रवर्तनं तू नीट पाहिली होतीस आणि प्रत्येक जंगली श्वापदाची पाऊल-खूण तुझ्या परिचयाची होती. डेर्सु, माणसांच्या जंगलातच केवळ वावरलेल्या आमच्यासारख्या शहरवासियांना हे सारं नव-नवखं होतं, अप्रूपच होतं आणि म्हणूनच तुझ्यासारख्या खऱ्याखुऱ्या जंगलात, माणूस नावाचा प्राणी म्हणून जगणाऱ्याला समजावून घेणं हेच मोठं थरारक होतं.

डेर्सु, तुझं गर्द रानात लपलेलं अनोखं घर मला दाखवलंस तेव्हा तर मी मंत्रमुग्धच होऊन गेलो. ते लाकडी ओंडके, त्यावर रचलेला पाला-पाचोळा आणि ओंडक्यांचा खडबडीत बिछाना ! माझा तर क्षणभर विश्वासच बसेना. तू एखादा आदिमानव तर नसावास ना ? दगड, माती, सिमेंटची घरं उभारून त्यांच्या आसऱ्याला निर्धास्त निवारा घेणाऱ्या आणि लाख मोलाच्या कलाकुसरीत ती सजवून काढणाऱ्या आमच्यासारख्या

शोभिवंत माणसांना हे सारं मुळीच मानवण्यासारखं नव्हतं. डेर्सु, तुझं आणि आमचंही नातं आता चांगलंच जुळून आलं. मनं जवळ आली. अविश्वासाच्या फटी बुजल्या. माझ्या सहाय्यक सैनिकांनीदेखील तुला चांगलं समजून–उमजून घेतलं. तू आमच्यासाठी त्या विकट जंगलीवाटा सोप्या करून द्यायला सुरवात केलीस. त्या वेळी एखाद्या चिल्लर–पिल्लर झाडाची बारीक–सारीक फांदीदेखील दुखावली जाऊ नये म्हणून तू किती काळजी घेतलीस. आम्ही दुष्ट माणसं तुझ्या निष्पापपणाला निर्लज्जपणे हसलो. तुला गावंढळ म्हणालो. तुझ्या भावडेपणाची टर उडवली; पण दोस्ता, झाडा–पानांनाच मित्र मानणाऱ्या, त्यांच्या भाव–भावनांची जतन करणाऱ्या तुला, आमच्या उपहासी हास्याची कदर करायचं कारणच नव्हतं. ढगांचे रंग–ढंग पाहूनच तू पाऊस–पाणी वर्तवलंस सूर्य–चंद्राची आकाशातली अविस्मरणीय जुगलबंदीही तूच आम्हाला एका उंच कड्यावरून अचूकपणे दाखवलीस. कधी झगमगत्या सूर्यात तू उजळून निघत होतास, तर कधी मुसळधार पावसाच्या झडीत अधिकच ताजा तजेलदार भासत होतास. निसर्गाशी असलेली तुझी अजोड बांधिलकीच त्याला निश्चितच कारण होती.

श्वापदांवर तर तुझं अपार प्रेम. भले ती आम्हाला हिंस्त्र, म्हणून भयंकर का वाटेनात! नुसत्या वासानं तू त्यांची अचूक चाहूल घ्यायचास. पानाच्या नुसत्या कुरबुरण्यातून त्यांचा माग घ्यायचास. जणू तू देखील त्यांच्यातलाच कोणी एक होऊन गेला होतास. फक्त दोन पायांवर चालत होतास एवढंच! जंगलचे न्याय नियम तुला छान अंगवळणीं पडले होते, म्हणूनच इतर प्राण्यांची प्रतिष्ठा तू जपत होतास; तशीच तेही तुझा आव राखून तुझ्या उगीचच वाटेला जात नव्हते. हे जंगलचे नियम झाले; पण आम्ही मात्र दुष्टावलेली शहरी माणसं, आम्ही 'वाटेवरचा वाघ' पहाताच त्याच्यावर सरळ एक गोळी चालवून मोकळे झालो. तो जखमी वाघ तिथून चालता झाला; पण डेर्सु, हे कृत्य तुला तर मुळीच आवडलं नाही. तू येवढंच म्हणालास 'फारच वाईट झालं!' आमच्यासारख्या भित्र्या जीवांना तो एक मोठाच पराक्रम वाटत होता! तर मुळात 'भीती' हा शब्दच शब्दकोशात नसणाऱ्या तुझ्यासारख्याला खांद्यावरच्या बंदुकीचा चाप न ओढताच अनेक वाघ–चित्ते सहज वश होत होते.

एकदा जंगलातच एक दारूची बाटली झाडाला टांगती ठेवून आम्ही नेमबाजीची स्पर्धा लावली. आमच्यातला कुणीच पठ्ठ्या, सैनिक असूनही अचूक नेम मारू शकला नाही; पण तुझी गोळी मात्र अचूक लक्ष्याला अलगद भेदून गेली. बाटली तुटून पडली. तू नुस्ती नेमबाजी करतोस, ह्या कल्पनेनं आम्ही तुला किती हसलो होतो. तू आणि इथेही डेर्सु, तूच अखेर आम्हाला लाजवलंस. ह्या बाबतीतलंही तुझं प्राविण्य अजोड असंच होतं. बंदुका आपणा सर्वांच्याच खांद्यावर होत्या; पण फक्त ते शस्त्र चालवायचं कौशल्य जसं आमच्यापाशी नव्हतं तसं ते केव्हा आणि कुठे वापरायचं ह्याचं भानही आम्हाला अजून आलं नव्हतं.

डेर्सु, एकदा जंगलात मात्र आमच्या चांगलंच जिवावर बेतलं. रानटी लोकांनी आमच्यावर निर्घृण हल्ला चढवून आम्हाला लुटलं. एवढंच नव्हे तर नदीच्या खोल; खळाळत्या पाण्यात हातपाय बांधून बुडवून ठेवलं. हा प्रसंगच मुळात भीषण होता. त्याही वेळी तूच आमच्या मदतीला धावलास आणि माझी आणि इतरांची सुटका केलीस. आम्हाला जीवदान दिलंस आणि वर आपल्या परीचयाच्या दुसऱ्या टोळीला त्या शत्रूच्या पारिपत्याला पाठवलंस! डेर्सु, असे किती तरी प्रसंग आले आणि गेले. तू मात्र दिल्या इमानाला जागलास; पण उत्तरेकडचा त्या संध्याकाळचा तो प्रसंग आठवला की, अजूनही माझ्या अंगावर शहारे येतात!

उत्तरेकडच्या, गोठून बर्फ झालेल्या एका तळ्याच्या शोधात आपण उत्तरेकडे गेलो होतो. तसे बरोबर आणखी दोन सहकारी देखील होते; पण आपण दोघेच वाट चुकलो आणि एका विस्तीर्ण बर्फाच्छादित प्रचंड माळावर येऊन पोहोचलो. त्या अफाट उघड्या पठारावर क्षितिजापर्यंत बर्फच बर्फ पसरलेलं, आपण शोधून शोधून थकलो; पण परतीच्या पाऊलखुणा मलाच काय, तुला देखील सहजी सापडेनात. आपण दोघंही हतबल झालो. तेवढ्यात सूर्यही मावळू लागला आणि सूर्यास्तानंतर चालून येणाऱ्या एका प्रचंड हिमवादळाची तुला वेळीच अचूक चाहूल लागली.

आता तिथे आपल्याला कसलाच आधार उरला नव्हता. भयाण घोंघावते वारे क्षितिजावरून चाल करून निघाले होते. तू त्वरा केलीस. हातातल्या चाकूनं प्रचंड रानटी गवत कापून त्याचा एक जागी ढीग रचू लागलास. आपण जिवाच्या भितीनं मरीमर राबलो. अंधार वाढू लागला, वारा डोक्यावरून भणाणत जात होता. तो भयाण वारा जणू आपणा दोघांना क्षितिजापार भेलकावत नेणार होता; पण तू जिद्दीचा. त्या भयाण वातावरणात देखील उसळत्या वाऱ्याशी झगडून झगडून आपण गवताचा सर्व्हे स्टॅंडच्या खांबावर बऱ्यापैकी ढीग रचला आणि मगच त्या गंजीखाली आपण आसरा घेतला. डेर्सु, खरंच ती रात्र वैऱ्याचीच होती! नंतर रात्री कधी तरी ते हिमवादळ ओसरलं. भल्या सकाळी आपण मुश्किलीनंच आपल्या आश्रमस्थानाबाहेर पडलो, तेव्हा गवताच्या त्या गंजीवर बर्फाचे थरावर थर साठलेले मी पाहिले तेव्हा सर्व्हेचा लाकडी स्टॅंड खांबासारखं ठेवून त्याच्या भोवती गवताचं घर झटक्यात उभारणाऱ्या तुझ्या कल्पकतेनंच मी थरारून गेलो आणि नंतर देखील हवेत बंदुकीचे बार काढूनच आपण आपल्या सहकाऱ्यांना गाठू शकलो; पण त्या वैऱ्याच्या रात्री, तूच मला मृत्यूपासून मुश्कीलीनं दूर ओढून आणलं होतंस– डेर्सु, तुझं ते अतुल धैर्य आजदेखील मला आणखीनच कृतज्ञ करून सोडतं.

डेर्सु, आमची ती मोहीम तिथंच संपुष्टात आली. आम्ही परतीची वाट धरली. शहराकडे घेऊन जाणाऱ्या रेल्वेलाईनवरच तू आमचा निरोप घेतलास आणि तुझ्या त्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीनं म्हणालास 'गुडलक!' बस्स एवढंच आणि मग तुरुतुरू चाळीत समोरचा उंच बर्फाच्छादित डोंगर चढत गेलास. रायफल उंचावून हसलास आणि त्या वरच्या रानात दिसेनासा झालास. मीच काय, माझे सहकारी देखील विलक्षण हुरहुरले. जीवन-मृत्यूशी झगडणारा, डोंगर-दऱ्यातून साथ देणारा आमचा निष्ठावान सहकारी मित्र पुन्हा एकदा त्याच्या रानात परतला होता. तुझं ते खळाळतं. मिश्कील हास्य आता कदाचित कायम येणारं नव्हतं.

तसं आम्ही तुला 'शहरात चल !' म्हणून आग्रहही धरला होता; पण तुझं डोंगरातलं घरच तुला अधिक प्रिय होत. 'नकोरे बाबा !' म्हणून तू ते आमंत्रण नाकारलंस.

डेर्सु, तेव्हा आम्हाला वाटलं होतं की आम्ही तुला कायमचंच गमावलाय. आता ह्या जंगलातल्या माणसाची भेट घेणं आमच्या भाग्यातच असणार नाही; पण तसं झालं नाही. आपल्या भेटीचा योग चार-दोन वर्षांतच पुन्हा एकदा जुळून आला. तेव्हा दुसरं एक पथक सर्वेक्षण मोहिमेवर निघालं आणि त्याही पथकाचा पुन्हा एकदा मीच प्रमुख होतो निघताना मनातून एकच एक इच्छा धरली होती, तुझी भेट व्हावी. प्रत्येक डोंगर-दरीत माझी भिरभिरती नजर केवळ तुझाच शोध घेत होती आणि एका रानात कुणी जंगली म्हातारा आल्याचं, माझ्या सहकाऱ्यांनी सांगताच मी तडक तिकडेच धावलो. तर तूच तिथे सापडून गेलास. मला पहाताच तू केवढ्यांदा खळाळत हसलास ! पुढे झालास आणि सरळ मला भेटलास. तुझं ते निर्मळ हास्य आणि त्यातून जाणणारं ते निर्मळ मन मी अजून देखील विसरून गेलो नाही.

डेर्सु, आमची दुसरी मोहीम लवकरच आटोपती घ्यावी लागली. याही वेळी तुला मी शहरात यायला विनवलं आणि आश्चर्य म्हणजे तू ते मानलंस म्हणजे गेल्या चार-पाच वर्षांत तू बराचसा बदलला होतास, वयानं वृद्धही झाला होतास. आयुष्यात एकदा तरी शहर काय असतं ते पहाण्याच्या कुतूहलानंही तुला डिवचलं असावं. कशानं का होईना तू माझ्याबरोबर शहरात आलास. माझ्या मनाला समाधानच मोठं होतं. तुझा टेपवरचा आवाज ऐकलेली, आणि तुझे माझे जंगलात टिपलेले फोटो पाहिलेली माझी पत्नीही तुला पहायला तशी खूपच उत्सुक होती. तुझ्या ह्या अनपेक्षित आगमनानं ती तर विलक्षण आनंदून गेलीच पण नंतर माझ्या छोट्या मुलाशीही तुझी चांगलीच गट्टी जमून गेली. रोज रोज तू त्याला रानातल्या नवनव्या गमती-जमती सांगितल्यास त्या बरोबरच आपलाही जीव तिथं रमवत राहिलास.

डेर्सु, तू शहरात आलास खरा, पण हे वातावरणही तुला मानवेना. तुझा जीव तिथे तळमळू लागला. खाणं-पिणं, संगीत कशातच तुझं मन रमेना. तू उदास होऊन गेलास. ते जिणंच तुला बेचव वाटत होतं. त्यातलं नकलीपण जाणवत होतं. इथले न्याय नियमही जंगलाहून निराळे होते. म्हणून लोक पाण्यासारखी गोष्ट विकत होते, त्यावर निर्वाह करत होते. तू तर साक्षात निसर्गाचा पुत्रच. पाण्यासारखं निसर्गाचं देणं, करंटेपणी विकणाऱ्यांवर तू सरळ थुंकलास. ही काय किंवा अशाच गोष्टी तुझ्या कल्पनेतही बसण्यासारख्या नव्हत्या. डेर्सु, तुला हे नवीन होतं. पण शहरातच जन्म काढणाऱ्यांना ह्यात काही विशेष वाटत नव्हतं. माती, लाकूड, दगड, इतकंच काय, स्मशानातली राख देखील विकून पोट भरणारी, माणसाची जमात अजून तू पाहिली नव्हतीस हेच काय पण इथली तंत्रच वेगळी त्यात साधं चालणं, फिरणं किंवा वावरणं देखील तुला अवघड होऊन बसलं. मग तू कंटाळून गेलास. मला विनंती केलीस. 'मला माझ्या पर्वताकडे परत जाऊ दे. तुझी अशी अचानक पाठवणी करणं मला मुळीच आवडलं नसतं. पण शेवटी माझं तुझ्यावर निर्भेळ प्रेमच होतं. तुझ्या म्हणण्यापुढे मी नाईलाजानं मान तुकवली. माझी अगदी आवडती वस्तू, खासी रायफल, तुला आठवण म्हणून भेट दिली. आणि जडशीळ अंत:करणानी तुला निरोप दिला.

आणि त्यानंतर वार्ता आली ती देखील भयंकर. म्हणजेच तुझ्या मृत्यूची. कशी कोण जाणे तुझी हत्या झाली होती. मीच दिलेल्या बंदुकीचा अपघात असो नाहीतर खून असो, तुझं ह्या जगातलं अस्तित्वच संपून गेलं होतं, हे मात्र निश्चित, एका स्त्रीनं वाघाला घातलेल्या गोळीचा तूच बळी ठरलास. आणि आता मृत्युनंतर देखील अजून तू वाघ होऊन स्त्रियाच्या शोधात फिरत असतोस. अशी देखील वदंता तुझ्यामागे तुझ्या टोळीत पसरली होती ! मी गेलो तर तुझा देह झाडांच्या सावलीला पाचोळ्यावर पहुडलेला. मी तुला ओळखलं ते चेहऱ्यावरून. तेव्हा माझा एक महान मित्र तिथे मरून पडलेला मी पाहिला. तुझा उरला-सुरला उत्तराधिकारी मीच होतो. अधिकाऱ्यानं प्रश्न केला नाव काय ?'

मी उत्तरलो 'डेर्सु उझाला'

'राहण्याचं ठिकाण ?'

'पर्वत !'

बस्स ! बाकी त्यांनाच काय मलाही तुझ्याबद्दल काहीच ठाऊक नव्हतं. ह्या नोंदीवर तात्त्विकपणानं सही घेतली गेली. खड्डा तर तयारच होता. त्यात देह ठेवला गेला आणि वर मातीही लोटली गेली. भूमीचा एक पुत्र भूमीच्या कुशीत निवांत झोपी गेला.

डेर्सु, तुझ्यासारखी निसर्गाला आपलासा करणारी, निखळ-निर्मळ माणसं आज फारच दुर्मिळ असतात मुळात निसर्गातच जन्माला घातलेली आजची माणसं रान-तोडून डोंगर उघडं-बोडके करतात. ती जाळून त्याचे कोळसे करतात, पर्वत पोखरून खनिज लुटतात, सुंदर-सुंदर पशु-पक्षी मारून स्टफ करून, विकतात. ही माणसं निसर्गाला देवविव मानत नसतात. तर हरघडी निसर्गाचंच भांडवल करून आपली दुष्ट पोटं भरतात. डेर्सु, तुझ्यासारख्या खऱ्याखुऱ्या निसर्गपुत्रांना मात्र ह्या आधुनिक जगात कुठलंच स्थान असू शकत नाही. आणि हीच ह्या काळाची आणि निसर्गाचीही भीषण शोकांतिका म्हणायला हवी !

तुझा,
कपितान

**संदर्भ :**
**चित्रपट : डेर्सु उझाला**
**दिग्दर्शक-अकीरा कुरोसावा**
**देश-जपान । रशिया**